मुंबई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in | E mail - dainikyuvakaadhar@gmail.com | facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : 3 ■ अंक : १०४ ■ सोमवार, २२ डिसेंबर २०२५ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514







# मतदारांनी उधळीत ये गुलाल म्हणत महाविकास आघाडीच्या भावना घाणेकर यांना घातली विजयाची माळ

## ■ उरण नगरपरिषदेच्या नगराध्यक्ष पदी भावना घाणेकर

**दैनिक युवक आधार**

**उरण प्रतिनिधी/सायली साळुंके :** उरण नगर परिषदेच्या 21 नगरसेवक आणि नगराध्यक्ष पदाच्या निवडणूक निकालाची प्रतीक्षा आज दि.21 डिसेंबर रिजी संपली.या निवडणुकी मध्ये उरण नगर परिषदेत थेट नगराध्यक्ष पदासाठी उभ्या असलेल्या महाविकास आघाडीच्या उमेदवार तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी( श्री शरदचंद्र पवारगट )च्या महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष भावनाताई घाणेकर यांना 9210 मत मिळूनत्या आपल्या प्रतिस्पर्धी भाजपच्या शोभा कोळी शाह,यांच्यावर 1470 मतांची आघाडी घेत त्यांचा पराभव केला आहे भाजपच्या शोभा कोळी शाहा यांना 7740 मतांवर समाधान मानावे लागले. तर नगराध्यक्ष पदाच्या शर्यतीत असणाऱ्या शिवसेना शिंदे गट रुपाली तुषार ठाकूर यांना 593,मते मिळाली असून, अपक्षझुंज देणाऱ्या नसरीन इसरार शेख यांना 116, मतांवर समाधान मानावे लागले.प्रयत्नाची शर्थ करूनही या दोघी आपली



अनामत रक्कम वाचवू शकल्या नाहीत.1470 मतांची आघाडी घेत नगराध्यक्ष पदाचा विजय संपादन करीत विजयी झालेल्या भावनाताई घाणेकर यांनी 21 नगर सेवका पैकी आपल्या पॅनेल च्या 9 नगर सेवकांना निवडून आणून इतिहास रचला आहे.तर भाजपच्या शोभा कोळी शाहा यांचा पराभव झाला असला तरी त्यांच्या पॅनेलचे 12 शिलेदार निवडून आले आहेत,या अटीतटीच्या सामन्यात केवळ 67.95 टक्के मतदान झाले.

एकूण10 प्रभागा मधून प्रभाग क्रमांक 1( अ ) रजनी सुनिल कोळी भाजप मिळालेली मते -1365, प्रभाग क्रमांक 1 (ब) जयविंद्र लक्ष्मण कोळी भाजप मिळालेली मते 1404, प्रभाग क्रमांक 2 (अ) रिबेका रविंद्र मढवी भाजप मिळालेली मते 1134, प्रभाग क्रमांक 2 ( ब) विक्रम राजेंद्र म्हात्रे( शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) ) मिळालेली मते 1081, प्रभाग क्रमांक 3( अ) वंदना विजय पवार शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) मिळालेली मते 971, प्रभाग क्रमांक 3 (ब) अमित हरिश्चंद्र म्हात्रे, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) मिळालेली मते 835, प्रभाग क्रमांक 4 (अ ) अतुल सुरेश ठाकूर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट )मिळालेली मते 1383 प्रभाग क्रमांक 4 (ब) प्रमिला संतोष पवार शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट ) मिळालेली मते 1153, प्रभाग क्रमांक 5 (अ) नाहिदा ठाकूर इंडियन नॅशनल काँग्रेस मिळालेली मते 831, प्रभाग क्रमांक 5 (ब) जसीम इस्माईल गॅस भाजप मिळालेली मते 1180, प्रभाग क्रमांक 6 (अ) मंगेश लक्ष्मण कासारे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट ) मिळालेली मते 927, प्रभाग क्रमांक 6 (ब) तनिषा सागर पाटील शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट )मिळालेली मते 791, प्रभाग क्रमांक 7( अ) प्रार्थना चेतन म्हात्रे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी मिळालेली मते 916, प्रभाग क्रमांक 7(ब) भाईर रवि यशवंत भाजप मिळालेली मते 1001, प्रभाग क्रमांक 8 (अ) वैवडे पूर्वा योगेश भाजप मिळालेली मते 815, प्रभाग क्रमांक 8 (ब) ॲड. रोहित नितीन पाटील भाजप मिळालेली मते 916, प्रभाग क्रमांक 9 (अ) गणेश सदाशिव पाटील भाजप मिळालेली मते 1089 प्रभाग क्रमांक 9 (ब) सायली विशाल पाटेकर भाजप मिळालेली मते 1027 प्रभाग क्रमांक 10 (अ) राजेश मधुकर ठाकूर भाजप मिळालेली मते 972, प्रभाग क्रमांक 10 (ब) सायली सविन म्हात्रे भाजप मिळालेली मते 929, प्रभाग क्रमांक 10 (क) दमयंती वैभव म्हात्रे भाजप मिळालेली 904हे शिलेदार निवडून आले आहेत.

## कौटुंबिक वादातून पत्रकार विजय दुंदरेकर व त्यांच्या कुटूंबियांना जीवे ठार मारण्याची धमकी

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर) :** कौटुंबिक वादातून पत्रकार विजय दुंदरेकर व त्यांच्या कुटूंबियांना जीवे ठार मारण्याची धमकी देण्यात आल्याची माहिती आज घेतलेल्या पत्रकार परिषदेमध्ये विजय दुंदरेकर व त्यांच्या कुटुंबीयांनी दिली आहे. या संदर्भात खांदेश्वर पोलीस ठाण्यात तक्रार देणारे विनय दुंदरेकर यांनी सांगितले की, नुकतेच त्यांच्या कुटुंबामध्ये दुःखद घटना घडली होती. यावेळी उत्तरकार्य कधी करायचे याबाबत त्यांच्या कुटुंबीयांची चर्चा होत असताना त्यांच्या कुटुंबियांमध्ये वादविवाद



झाले यावेळी त्यांच्या कुटुंबियातील आदित्य दुंदरेकर याने शिवीगाळ करून त्यांना मारण्यासाठी धावला यावेळी आदित्यने बाजूलाच पडलेला लाकडी दंडका उचलून यांच्या विनय दुंदरेकर यांच्या डोक्यात मारला त्यात ते गंभीर जखमी झाले होते. यावेळी सचिन पाटील व किशोर भगत हे सुद्धा आदित्यच्या मदतीला उभे राहिले होते. यावेळी त्यांनी दुंदरेकर कुटुंबियांना धमकावून तुमचा कार्यक्रम लवकरच करतो अशी धमकी दिली. तसेच अनंत दुंदरेकर यांनी सुद्धा विजय दुंदरेकर यांच्या पाठीवर लाकडी बॅटने मारहाण केली. या संदर्भात पत्रकार विजय दुंदरेकर व त्यांचा मुलगा विनय दुंदरेकर, गीता दुंदरेकर, यांनी खांदेश्वर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. परंतु या तक्रारीची योग्य ती दखल पोलिसांकडून घेतली जात नसल्याचे दुंदरेकर कुटुंबियांचे म्हणणे आहे. तरी याबाबत या चौघांविरोधात कडक कायदेशीर कारवाई करावी तसेच पत्रकार सुरक्षा कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करावा अशी मागणी पत्रकार परिषदेमध्ये विजय दुंदरेकर यांनी केली आहे. या संदर्भात त्यांनी सहाय्यक पोलीस आयुक्त व पोलीस उपायुक्त यांना सुद्धा निवेदन दिल्याचे दुंदरेकर कुटुंबीयांनी सांगितले आहे.

## उरणमध्ये महाविकास आघाडीचा दणदणीत विजय

### महेंद्रशेठ घरत यांनी खासदार बाळ्या मामा यांचेही केले अभिनंदन !

**दैनिक युवक आधार**

**उलवे,प्रतिनिधी :** "उरण नगरपालिकेत नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत भावना घाणेकरांचा विजय महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांना नवचैतन्य देणारा आहे. ज्या वेळी महाविकास आघाडीत नगराध्यक्षपदाच्या उमेदवाराबाबत प्राथमिक चर्चा सुरू होती, तेव्हाच मी माजी आमदार मनोहर भोईर यांना सांगितले की, भावना घाणेकर टक्कर देणाऱ्या आणि जिंकणाऱ्या उमेदवार आहेत. त्या राजकारणात सक्रिय आहेत, त्या लढाऊ आहेत. त्यामुळे भावना घाणेकरच उमेदवार हव्यात, या निर्णयावर मी ठाम राहिलो. आज तो निर्णय भावना घाणेकरांच्या विजयाने सार्थ ठरला, याचा




मला मनस्वी आनंद आहे. त्यामुळे भावना घाणेकर यांचा दणदणीत विजय 'ए तो झाकी, बहोत कुछ बाकी है'. जे म्हणत होते, भावना घाणेकर यांचे डिपॉझिट जप्त होईल. त्यांना भावना घाणेकरांच्या दणदणीत विजयाने 'एकही मारा लेकीन सॉलिड मारा', अशी अवस्था करून ठेवली आहे. उरणमध्ये महाविकास आघाडीच्या सर्वच कार्यकर्त्यांनी, नेत्यांनी खूप मेहनत घेतली. खासदार बाळ्या मामा, अमोल कोल्हे, सुषमा अंधारे यांसारख्या नेत्यांनी प्रचाराच्या अंतिम टप्प्यात महत्त्वाची भूमिका निभावली. त्यामुळे उरणमध्ये महाविकास आघाडीला उत्तम यश मिळाले, या निवडणुकीत मी चाणक्य नीतीचा वापर केला, असे काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत म्हणाले. विजयाच्या आनंदाने

> “ ए तो झाकी है : महेंद्रशेठ घरत

महेंद्रशेठ घरत यांचा चेहरा फुलला होता. यावेळी त्यांनी खासदार बाळ्या मामा यांच्याशी मोबाईलवरून संपर्क साधून महाविकास आघाडीच्या विजयाबद्दल अभिनंदन केले. यावेळी महेंद्रशेठ घरत म्हणाले, "उरणबाबत आपण घेतलेली रोखठोक भूमिका मतदारांना आवडली. आपण मतदानाच्या दिवशी स्वतः येऊन कार्यकर्त्यांना प्रोत्साहन दिलेत, ठामपणे मागे राहिलात याचा निश्चितच फायदा उरण नगरपालिका निवडणुकीत झाला. त्याबद्दल तुमचेही अभिनंदन आणि आभार!"

## मनोरंजक खेळातून गणिताची गोडी

### वैनतेय विद्यामंदिरात ‘राष्ट्रीय गणित दिन’ उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी/राहुल कुलकर्णी :** गणित विषय म्हटला की अनेक विद्यार्थ्यांना तो कंटाळवाणा व भीतीदायक वाटतो. मात्र, ही भीती दूर करून गणिताची गोडी लावण्यासाठी मनोरंजक खेळ, आकर्षक शैक्षणिक साहित्य व कृतीयुक्त आनंददायी उपक्रमांचा प्रभावी वापर करण्यात आला. दप्तरमुक्त शनिवारी ‘राष्ट्रीय गणित दिना’निमित्त निफाड येथील वैनतेय प्राथमिक विद्यामंदिरात हा उपक्रम मोठ्या उत्साहात राबविण्यात आला.

महान भारतीय गणितज्ञ श्रीनिवास रामानुजन यांचा जन्मदिन ‘राष्ट्रीय गणित दिन’ म्हणून साजरा केला जातो. यानिमित्त विद्यार्थ्यांच्या हस्ते रामानुजन यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. शिक्षक गोरख सानप यांनी पाढे, भूमितीय आकार, संख्याडोंगर, अंकी-अक्षरी संख्या यांवर आधारित आकर्षक गणिती मुकुट तयार केले. विद्यार्थ्यांनी हे मुकुट परिधान करून ‘माझा पाढा माझा मुकुट’, ‘संख्यांचा डोंगर बनवूया’, ‘कोण आहे



**निफाड : दप्तरमुक्त शनिवारी राष्ट्रीय गणित दिनानिमित्त गणितज्ञ श्रीनिवास रामानुजन यांच्या प्रतिमेचे पूजन करताना व पाढे, संख्याडोंगर, भूमितीय आकारांचे मुकुट परिधान केलेले वैनतेय प्राथमिक विद्यामंदिरातील विद्यार्थी व शिक्षक.**

मोठा’, ‘चढता क्रम लावूया’, ‘आकार शोधूया’, ‘उदाहरणे बनवूया’ अशा विविध खेळांमधून गणित शिकण्याचा आनंद घेतला.

मुलांच्या मनात अंक व गणितीय उदाहरणे सोडविताना येणारा ताण, अस्वस्थता, परीक्षेचा दबाव, पालकांच्या अपेक्षा व आत्मविश्वासाचा अभाव ही गणितभीतीची प्रमुख कारणे असल्याचे यावेळी सांगण्यात आले. कृतीयुक्त व आनंददायी शिक्षण पद्धतींच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आवडतील असे अनुभव दिल्यास ही भीती दूर होऊन गणिताची गोडी निश्चितच लागते, असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.याप्रसंगी शिक्षक गोरख सानप यांनी श्रीनिवास

> “ “गणिताच्या मुकुटातील मनोरंजक खेळांमुळे उदाहरणे सोडविण्याचा खूप आनंद मिळाला. या खेळांमुळे गणिताची भीती जाऊन गणित विषय आवडीचा झाला आहे.”
> — अझर सैय्यद, विद्यार्थी, वैनतेय प्राथमिक विद्यामंदिर, निफाड

रामानुजन यांच्या जीवनकार्याची माहिती विद्यार्थ्यांना दिली. सकारात्मक दृष्टीकोनातून राबविण्यात आलेल्या या अभिनव उपक्रमाचे न्या. रानडे विद्याप्रसारक मंडळ, निफाड संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष वि. दा. व्यवहारे, सचिव रतन वडघुले, विश्वस्त किरण कापसे, राजेंद्र राठी, राजेश सोनी, ॲड. दिलीप वाघावकर, विश्वास कराड, मधुकर राऊत, प्रभाकर कुयटे, नरेंद्र नांदे, निफाड पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी विलास साळी, विस्तार अधिकारी लता भरसट, कैलास बोरसे, वसंत गायकवाड, केंद्रप्रमुख अनिता आहिरे, मुख्याध्यापिका सुजाता तनपुरे तसेच पालकांनी विशेष कौतुक केले.

## सिल्लोडच्या श्री छत्रपती शिवाजी विद्यालयात कायदेविषयक मार्गदर्शन शिबिर उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/सिल्लोड :** विद्यार्थ्यांनी कायद्याचे ज्ञान आत्मसात करून एक जबाबदार नागरिक बनावे, या उद्देशाने येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय, सिल्लोड येथे तालुका विधी सेवा समिती आणि तालुका वकील संघ यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य कायदेविषयक मार्गदर्शन शिबिर उत्साहात पार पडले. जागतिक मानवाधिकार दिनाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरात तज्ज्ञांनी विविध कायद्यांवर प्रकाश टाकला.या महत्त्वपूर्ण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सिल्लोड दिवाणी न्यायालयाचे दिवाणी न्यायाधीश एस. एस. देशमुख होते. प्रमुख पाहुणे म्हणून सहदिवाणी न्यायाधीश ए. एच. तट्टू, सिल्लोड शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शेषराव उदार, पंचायत समितीचे गटविकास अधिकारी रत्नाकर पगार, सहाय्यक विस्तार अधिकारी श्री. पंडित साहेब आणि विद्यालयाचे मुख्याध्यापक संजीव दौड यांची उपस्थिती होती. मार्गदर्शन करताना सहदिवाणी न्यायाधीश ए. एच. तट्टू यांनी 'पोक्सो' (POCSO) कायदा आणि हुंडाबळी प्रतिबंधक कायद्याविषयी अतिशय सोप्या भाषेत सविस्तर माहिती दिली. पोलीस निरीक्षक शेषराव उदार यांनी वाहतुकीचे नियम पाळणे ही काळाची गरज असल्याचे सांगून रस्ते सुरक्षेबाबत विद्यार्थ्यांना सतर्क केले. तसेच, ॲड. शेख उस्मान यांनी जागतिक मानवाधिकार आणि ॲड.




एस. आर. काकडे यांनी 'दिव्यांग व्यक्तींचे हक्क कायदा २०१६' यावर सखोल मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर घातली.

आपल्या अध्यक्षीय भाषणात न्यायाधीश एस. एस. देशमुख यांनी दैनंदिन जीवनातील विविध कायद्यांचे महत्त्व अधोरेखित केले. कायद्याचे पालन केल्यास अनेक संकटांपासून दूर राहता येते, असे त्यांनी नमूद केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक ॲड. अशोक तायडे यांनी केले, तर सूत्रसंचालन ॲड. आर. एस. गोराडे यांनी प्रभावीपणे केले. विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक सपाटे सर यांनी उपस्थितांचे आभार मानले.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी वकील संघाचे सचिव ॲड. हमीद खान यांच्यासह ॲड. मोठे, ॲड. खंडळकर, ॲड. पठाण, ॲड. बडक, ॲड. मगर, ॲड. आर.के., ॲड. ताठे, हिरेकर, विठोरे तसेच विद्यालयाचे पर्यवेक्षक म्हस्के सर, मगर सर, कोलोड सर, परदेशी सर, राजपूत सर,सोनवणे सर आणि संपूर्ण शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. या शिबिराला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

# भगवदगीता आपल्या संस्कृतीचा आत्मा - आमदार प्रशांत ठाकूर

## भारत बुद्धी, ज्ञान आणि मूल्यांचा देश - समीरा गुजर-जोशी

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** भगवद्गीतेत केवळ धार्मिक उपदेश नाही, तर जीवन जगण्याची कला सांगितलेली आहे. कर्तव्य, कर्मयोग, भक्तीयोग आणि ज्ञानयोग यांचा सुंदर समतोल गीतेत दिसतो. कर्तव्य करताना फलाची अपेक्षा न ठेवणे, धैर्याने संकटांना सामोरे जाणे आणि स्वतःचा धर्म ओळखणे हे संदेश आजही तितकेच महत्त्वाचे आहेत, त्यामुळे भगवदगीता आपल्या संस्कृतीचा आत्मा आहे, असे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी आज (रविवार, दि. २१) येथे केले.

देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पार्टी पनवेल तालुका, संस्कार भारती पनवेल महानगर, संस्कृत भारती पनवेल यांच्या वतीने श्रीगुरुकुलम् न्यासतर्फे सप्टेंबर महिन्यात श्री. विरुपाक्ष मंगल कार्यालय येथे "श्रीमद् भगवद् गीता पाठ महायज्ञ" संपन्न झाले. या संस्कारमय कार्यक्रमाच्या अनुषंगाने श्रीमद भगवद गीता पठण स्पर्धेची घोषणा आमदार प्रशांत ठाकूर यांनी केली होती. विशेष म्हणजे पनवेलमध्ये प्रथमच आयोजन करण्यात आलेल्या या स्पर्धेला उदंड प्रतिसाद लाभला. या स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ आणि समीरा गुजर - जोशी यांचे प्रकट व्याख्यान शहरातील गोखले सभागृहात झाले. त्यावेळी मार्गदर्शन करताना आमदार प्रशांत ठाकूर बोलत होते.

यावेळी प्रमुख वक्ता सुप्रसिद्ध अभिनेत्री व सूत्रसंचालिका समीरा गुजर - जोशी, भाजपचे उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, माजी उपमहापौर चारुशीला घरत, पनवेल मंडल अध्यक्ष सुमित झुंझारराव, माजी नगरसेवक अजय बहिरा, राजू सोनी, प्रभाकर बहिरा, माजी नगरसेविका प्रिती जॉर्ज, सुलक्षणा टिळक, संस्कृत भारतीच्या अनया करंदीकर, नीलांबरी जोशी, जुई चव्हाण, गुरुकुलम न्यास अध्यक्ष मंजिरी फडके, ॲड. अमित चव्हाण, कामगार आघाडीचे प्रदेश सचिव संजय भगत, रुपेश नागवेकर, प्रितम म्हात्रे, विनायक मुंबईकर, सांस्कृतिक सेलचे जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन, युवा मोर्चा शहराध्यक्ष हिमेश बहिरा यांच्यासह विद्यार्थी, युवा, महिला आणि ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

भारतीय संस्कृतीच्या परंपरेत श्रीमद् भगवद्गीता हे ग्रंथरत्न विशेष मानाचे स्थान राखून आहे. भगवान श्रीकृष्णांनी अर्जुनाला दिलेले गीतेतील उपदेश आजही मानवाला सत्य, कर्तव्य, धैर्य आणि आत्मज्ञानाचा मार्ग दाखवतात. या आध्यात्मिक ज्ञानाच्या



प्रवाहाला नवे तेज देण्यासाठी या स्पर्धेच्या माध्यमातून काम केले जात आहे. ही स्पर्धा हा केवळ श्लोक पठणाचा कार्यक्रम नसून, विद्यार्थ्यांच्या अंतर्मनात संस्कारांची पेरणी करण्याचा एक सुंदर प्रयत्न असतो. योग्य उच्चारण, छंद, लय आणि भावपूर्ण अभिव्यक्तीद्वारे गीतेचे श्लोक सादर करताना विद्यार्थ्यांमध्ये एकाग्रता, स्मरणशक्ती आणि मानसशांती विकसित होते. गीता पठण हे प्राचीन भारतीय वाङ्मयातील संगीतात्मक परंपरेचाही एक भाग आहे. श्लोकांच्या ध्वनीत एक विशिष्ट लय असते, जी मनाला स्थिर ठेवते. त्यामुळे स्पर्धेची तयारी करताना केवळ श्लोक पाठ होतात असे नाही; तर त्यांना संस्कृत भाषेचे सौंदर्य, तिचे व्याकरण आणि ध्वनी माधुर्य यांचाही परिचय होतो. यामुळे त्यांची भाषिक आणि बौद्धिक प्रगती अधिक दृढ होते. त्यामुळे श्रीमद् भगवद्गीता चे महत्व अनन्य साधारण आहे. त्या अनुषंगाने पुढे बोलताना आमदार प्रशांत ठाकूर यांनी भगवद गीतेचे महत्व आपल्या भाषणातून मांडले. संस्कृत भाषा ज्ञानाची आणि संस्कृतीची आहे. आपल्या देशातील भाषा आणि साहित्य देशाचे वैभव आहे, त्या अनुषंगाने आपली संस्कृती वृद्धिंगत होत राहणे हि आपल्या सर्वांची जबाबदारी आहे, असे नमूद करून भगवद गीतेचे ज्ञान जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचावे हा मूळ उद्देश या स्पर्धेचे होते हे त्यांनी अधोरेखित केले. या स्पर्धेला मिळालेला प्रतिसाद ऊर्जा देणारा आहे.हि स्पर्धा यशस्वी करण्यासाठी भारतीय जनता पार्टी पनवेल तालुका, संस्कार भारती पनवेल महानगर, संस्कृत भारती पनवेल आणि श्री गुरुकुलम न्यास यांनी विशेष मेहनत घेतली असल्याचे नमूद करून यापुढेही हि स्पर्धा अखंडपणे सुरु राहिली पाहिजे यासाठी आपण सारे कायम प्रयत्नशील राहू या, असे आवाहन करून स्पर्धक तसेच आयोजन समितीमधील सर्वांना त्यांनी धन्यवाद दिले.

यावेळी वक्ता म्हणून बोलताना समीरा गुजर-जोशी यांनी म्हंटले कि, आपली संस्कृती ही आपल्या ओळखीचा आत्मा आहे आणि ती कधीही विसरता कामा नये. भारत हा बुद्धी, ज्ञान आणि मूल्यांचा देश असून येथे शब्दांचे उच्चार, त्यांचा अर्थ आणि विचारांना विशेष महत्त्व दिले जाते. भारतीय संस्कृती जगभरात तिच्या महान परंपरा, तत्त्वज्ञान आणि जीवन मूल्यांमुळे ओळखली जाते. यशस्वी, संतुलित आणि अर्थपूर्ण जीवनासाठी भगवद्गीतेचे मार्गदर्शन अत्यंत महत्त्वाचे आहे. भगवद्गीतेत सांगितलेला कर्मसिद्धांत माणसाला कर्तव्यनिष्ठ राहून, फळाची अपेक्षा न करता कार्य करण्याची प्रेरणा देतो. हा सिद्धांत व्यक्तिमत्त्व विकास, आत्मविश्वास आणि जीवनातील यशासाठी दिशादर्शक ठरतो. भारतीय संस्कृतीचे जतन आणि भगवद्गीतेतील विचारांचा अंगीकार केल्यास समाज अधिक सुसंस्कृत, विचारशील आणि मूल्याधिष्ठित बनेल, असे सांगून जो घटक संपूर्ण समाजाला एकत्र बांधून ठेवतो, मूल्ये, नैतिकता आणि एकोप्याची भावना निर्माण करतो, त्याला खऱ्या अर्थाने धर्म म्हणता येते, असेही त्यांनी नमूद केले. यावेळी त्यांनी साने गुरुजी, विनोबा भावे, बहिणाबाई यांचे उदाहरणे देत भावी व युवा पिढीला सरळ सोप्या भाषेत संवादातून मार्गदर्शन केले. तसेच सांस्कृतिक दृष्टया महत्वाच्या या स्पर्धेच्या आयोजनाबद्दल आमदार प्रशांत ठाकूर यांचे आभारही व्यक्त केले.

**- विजेत्यांची नावे खालीलप्रमाणे-**

**- खुला गट-**

प्रथम क्रमांक - श्रुती संदीप विरकर

द्वितीय क्रमांक (विभागून)- निता लक्ष्मण भुजबळ आणि निवेदिता मधुकर नाईक

तृतीय क्रमांक - शैला शरदराव कन्नडकर

**- शालेय गट-**

**■ इयत्ता ३ री व ४थी**

प्रथम क्रमांक - भाविका ओमकार कुलकर्णी

द्वितीय क्रमांक - साई तुळशीराम गांडाळ

तृतीय क्रमांक - शिवम निवास डांगरकर

**■ इयत्ता ५वी ते ७ वी**

प्रथम क्रमांक - राधा अंबरीश सहस्रबुद्धे

द्वितीय क्रमांक - अथश्री जोशी

तृतीय क्रमांक - ईश्वरी कट्टी

**■ इयत्ता ८ वी ते १०वी**

प्रथम क्रमांक - परिभूषण कुलकर्णी

द्वितीय क्रमांक - आभा टिळक

तृतीय क्रमांक - विद्यारण्य सचिन गोंधळी

खुला गटातील प्रथम क्रमांकास २१ हजार रुपये, द्वितीय क्रमांकाला १८ हजार रुपये आणि तृतीय क्रमांकास १५ हजार रुपये, तर शालेय गटातील इयत्ता ३ री व ४थी मधील प्रथम क्रमांकास ५ हजार रुपये, द्वितीय क्रमांकास ३ हजार रुपये तर तृतीय क्रमांकास २ हजार रुपये, इयत्ता ५वी ते ७वी मधील प्रथम क्रमांक ११ हजार रुपये, द्वितीय क्रमांकाला ८ हजार तर तृतीय क्रमांकाला ५ हजार रुपये तसेच इयत्ता ८वी ते १०वी मधील प्रथम क्रमांकास १५ हजार रुपये, द्वितीय क्रमांकाला ११ हजार रुपये आणि तृतीय क्रमांकाला ८ हजार रुपये असे बक्षिसांचे स्वरूप होते. त्याचबरोबर प्रत्येक स्पर्धकाला सहभाग प्रमाणपत्र, तसेच विजेत्याला सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

## दादासाहेब फाळके चित्रपट युनियनतर्फे ‘दादासाहेब फाळके अवॉर्ड-२०२५’

**दैनिक युवक आधार**

**किशोर गुडेकर, मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख :** भारतीय चित्रपटसृष्टीचे दिग्गज आणि ‘भारतीय चित्रपटसृष्टीचे जनक’ म्हणून ओळखले जाणारे दादासाहेब फाळके यांच्या नावाने दरवर्षी देण्यात येणारा प्रतिष्ठेचा ‘दादासाहेब फाळके अवॉर्ड-२०२५’ यावर्षीही भव्यदिव्य पद्धतीने आयोजित करण्यात आला आहे. दादासाहेब फाळके चित्रपट युनियनतर्फे जाहीर झालेल्या या पुरस्कारासाठी विविध क्षेत्रातील अनेक दिग्गज कलावंतांची निवड करण्यात आली आहे.




या पुरस्कार सोहळ्यात रोहिणी हट्टंगडी, विजय पाटकर, अरुण नलावडे, वर्षा दांदळे, गिरीश ठापर, विलास बडे, उस्ताद मकबूल हुसेन खान, सुनील गोडबोले आणि दिलीप सेन, जावेद हैदर, यांच्यासह अनेक मान्यवर कलाकारांचा गौरव करण्यात येणार आहे. अभिनय, दिग्दर्शन, संगीत, कला आणि सांस्कृतिक योगदानाच्या आधारे या कलावंतांनी दिलेल्या अनमोल कार्याची दखल घेत यंदाचे अवॉर्ड ठरविण्यात आले आहेत.

दादासाहेब फाळके चित्रपट युनियन ही भारत सरकारकडून नोंदणीकृत संस्था (अजित म्हामुणकर - राष्ट्रीय अध्यक्ष) असून ,अध्यक्षांच्या मार्गदर्शनाखाली ‘Appreciation to the Creation’ या उद्दिष्टाने गेल्या अनेक वर्षांपासून चित्रपटसृष्टीत कार्यरत व्यक्तींना प्रोत्साहन देत आहे. २०२५ चा अवॉर्ड सोहळा अधिक भव्य, अधिक समृद्ध आणि कलावंत-केंद्रित करण्याचा युनियनचा प्रयत्न असल्याचे आयोजकांनी सांगितले.

या वर्षीचा कार्यक्रम रविंद्र नाट्य मंदिर, प्रभादेवी, सिद्धिविनायक मंदिराजवळ, मुंबई येथे उत्साहात पार पडणार आहे. रसिक, कलावंत आणि नागरिकांसाठी नोंदणी प्रक्रिया सुरू असून ‘Register Now – 81081 48889’ या क्रमांकावर संपर्क साधता येणार आहे.

चित्रपटसृष्टीतील अनुभवी तसेच नवोदित कलाकारांसाठी हा पुरस्कार एक मोठा सन्मान मानला जातो.

दादासाहेब फाळके यांच्या स्मृती कायम ठेवत भारतीय चित्रपटजगताचा जागतिक स्तरावरचा लौकिक वाढविण्यासाठी हा उपक्रम महत्त्वाची भूमिका बजावत आहे.

## कोकण ज्ञानपीठ कला वाणिज्य महाविद्यालयात श्रमसंस्कार शिबीर संपन्न

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर/उरण प्रतिनिधी :** दिनांक २० डिसेंबर २०२५ रोजी कोकण ज्ञानपीठ कला व वाणिज्य महाविद्यालय , उरणच्या एन एस एस विभागाच्या श्रमसंस्कार शिबिर अंतर्गत कर्मवीर भाऊराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय पिरकोन येथे फ्रेंड्स ऑफ नेचर ( फॉन) सर्पमित्र निसर्गसंवर्धन संस्था चिरनेर उरण,रायगड( महाराष्ट्र ) तर्फे "पर्यावरण रक्षा –मानव सुरक्षा" या विषयावर संस्थेचे संस्थापक अध्यक्ष जयवंत रामदास ठाकूर व सदस्य राकेश सुरेश शिंदे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना पर्यावरण व मानव–वन्यजीव संघर्ष तसेच सर्प ओळख,सर्पदंश कसे टाळावे व सर्पदंश झाल्यास काय करावे? संस्थेच्या शून्य सर्पदंश मृत्यू अभियान प्रकल्पाबद्दल जनजागृती केली.तसेच संस्थेचे सदस्य निकेतन रमेश ठाकूर यांनी सध्या महाराष्ट्रात सुरू असलेल्या मानव –बिबट संघर्ष ,त्याची




कारणे व त्यावरील उपाययोजना याबाबत उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ. दत्ता हिंगमिरे यांची सन्माननीय उपस्थिती लाभली.

## नवीन वर्षाच्या स्वागतासाठी पनवेल परिसरातील फार्म हाऊस गजबजणार

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर) :** नवीन वर्षाच्या स्वागतासाठी पनवेल परिसरातील फार्म हाऊस गजबजताना दिसणार असल्याने अनेक फार्महाऊसमध्ये सर्व शासकीय नियमांचे पालन करीत जय्यत तयारी सुरु असल्याचे दिसत आहे.

यावर्षी वर्ष अखेर ३१ डिसेंबरला असून या दिवशी बुधवार आहे. त्यामुळे विविध परिसरातील पर्यटक मोठ्या प्रमाणावर पनवेल परिसरात मोठी गर्दी करणार व आहेत. थर्टी फर्स्टच्या दिवशी बुधवार असल्यामुळे पिणाऱ्यांची मोठी चंगळ होणार आहे. हजारो कोंबड्या, कोंबडे, बकरे यांची , कत्तल होणार आहे.

यावर्षी पाऊस जवळजवळ सहा महिने सातत्याने पडत होता. त्यामुळे वातावरणात मोठा बदल झाला असून वालाच्या शेंगाचा बहर



उशिराने येणार आहे. त्या दिवशी पोपटीची चंव फार थोड्या प्रमाणावर मिळणार आहे. गावठी कोंबड्यांची मागणी मोठ्या प्रमाणावर असल्यामुळे कोंबडीची किंमत रु ४०० ते ५०० तसेच कोंबड्याची किंमत रु ८०० आणि त्यापुढे आहे. गावठी कोंबडा कोंबडीच्या शोधामध्ये अनेक जण आताच फिरू लागले आहेत. पनवेल परिसरात मोठ्या प्रमाणात फार्महाउस असून त्यामध्ये प्रामुख्यांने राज रिसॉर्ट, छाया रिसॉर्ट, एम. जे. रिसॉर्ट, एस, आर रिसॉर्ट, विसावा रिसॉर्ट, रियाण फार्महाउस आदी फार्महाऊसमध्ये दरवर्षी नवीन वर्षाच्या स्वागतासाठी मोठ्या प्रमाणात नागरिकांची गर्दी असते.

> **दरवर्षी प्रमाणे यंदाही मोठ्या प्रमाणात ग्राहक राज रिसॉर्ट मध्ये येणार असल्याने सर्व शासकीय नियमांचे पालन करून येथे नियोजन करण्यात आल्याने त्यांना एक वेगळा अनुभव यावर्षी सुद्धा नक्कीच मिळेल**
> **- मालक संतोष उरणकर**

या वर्षीसुद्धा मुंबई, नवी मुंबई, रायगड, ठाणे परिसरातील नागरिकांनी पनवेल परिसरात असलेल्या फार्महाऊसमध्ये नवीन वर्षाचे स्वागत करण्याचे योजिले असल्याने पूर्वीपासून त्यांनी येथे बुकींग करून ठेवली आहे. फार्महाउस वाल्यांनी सुद्धा सर्वसामान्यांना परवडेल असे दर ठेवले आहेत. त्यामुळे हे फार्महाउस हाऊसफुल्ल झाले आहेत.

## गव्हाण हायस्कूलमध्ये ग्रामस्वच्छता अभियान

**दैनिक युवक आधार**

**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/एम.डी.भोईर :** रयत शिक्षण संस्थेचे श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेज,गव्हाण कोपर विद्यालयात शनिवार दि. २० डिसेंबर २०२५ रोजी संत गाडगेबाबा पुण्यतिथी निमित्त ग्रामस्वच्छता अभियान राबविण्यात आले. विद्यालयाच्या प्राचार्या व रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या सौ. ज्योत्स्ना ठाकूर, उपमुख्याध्यापक श्री विलासराव लेंभे,पर्यवेक्षिका सौ शशिकला पाटील मॅडम, संस्थेचे लाइफ वर्कर देवेंद्र म्हात्रे, पालक प्रतिनिधी साईनाथ मोकल आणि सर्व शिक्षक वृंदांनी संत शिरोमणी गाडगे महाराजांच्या प्रतिमेचे पूजन केले. सर्व विद्यार्थ्यांनी 'गोपाळा गोपाळा,देवकी नंदन गोपाळा' या भजनाचे गायन केले.

यानंतर वर्षभरासाठी प्रत्येक वर्गातील



स्वच्छता दुत म्हणून नेमणूक केलेल्या विद्यार्थ्यांनी कोपर गावातील प्रसिध्द हनुमान मंदिर व मंदिरा सभोवतालच्या परिसराची स्वच्छता केली. हाती खराटे झाडू घेवून विद्यार्थ्यांनी या स्वच्छता अभियानात उत्साहाने सहभाग घेवून स्वच्छता केली. आनंदाची बाब अशी की या स्वच्छता अभियानात कोपर गावातील ग्रामस्थांनी देखील सहभाग घेतला. यामध्ये सामाजिक कार्यकर्ते श्री सुधीर ठाकूर,कोपरगाव अध्यक्ष श्री वैभव घरत, श्री सुहास देशमुख, सौ.जयश्री पाटील ,सौ कांता पाटील आणि इतर ग्रामस्थ बंधू-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दैनिक युवक आधार (RNI NO :- MAHMAR/2023/89514) हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता.

daily YUVAK ADHAR Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# स्वच्छतेतून पित्याला श्रद्धांजली : अंभोरा गावातील खाकाळ कुटुंबाचा समाजाला प्रेरणादायी संदेश

## वडिलांच्या स्मृतीप्रित्यार्थ केली स्मशानभूमीची स्वच्छता

**दैनिक युवक आधार**

**बाळासाहेब रकटाटे/अंभोरा प्रतिनिधी :** आष्टी तालुक्यातील अंभोरा गावचे रहिवासी कै. सयाजी बजरंग खाकाळ यांचे नुकतेच दुःखद निधन झाले. वडिलांच्या स्मृती जपताना खाकाळ कुटुंबाने पारंपरिक पद्धतींपेक्षा वेगळा आणि समाजाला दिशा देणारा उपक्रम राबवून सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे.कैलासवासी सयाजी खाकाळ यांच्या मुलांनी आपल्या वडिलांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी गावातील स्मशानभूमीची संपूर्ण स्वच्छता करण्याचा निर्णय घेतला. स्मशानभूमी परिसरातील कचरा, गवत, काटेरी झुडपे व अस्वच्छता दूर करून परिसर स्वच्छ व पवित्र करण्यात आला. हा उपक्रम केवळ स्वच्छतेपुरता मर्यादित न राहता समाजात सकारात्मक बदल घडवणारा ठरला. ज्येष्ठ नागरिक सुभाष (नाना) आमले यांनी ही संकल्पना मांडली व

नुकतीच संपन्न झालेल्या संत गाडगेबाबा यांच्या पुण्यतिथीच्या पार्श्वभूमीवर खाकाळ कुटुंबाने त्यांच्या स्वच्छतेच्या संदेशाचे प्रत्यक्ष पालन केले. संत गाडगेबाबांनी दिलेला "स्वच्छता हीच खरी सेवा" हा संदेश कृतीतून साकारत बन्सी खाकाळ नामदेव खाकाळ शंकर खाकाळ शिवाजी खाकाळ यांच्यासह कुटुंबातील सदस्यांनी स्वच्छतेसाठी लागणारा संपूर्ण खर्च स्वतः केला आणि स्वतःही



श्रमदान केले.या आगळ्या-वेगळ्या उपक्रमामुळे गावात स्वच्छतेबाबत जागृती निर्माण झाली असून, स्मशानभूमीसारख्या दुर्लक्षित ठिकाणी स्वच्छतेचे महत्त्व अधोरेखित झाले आहे. वडिलांना स्वच्छतेच्या रूपाने श्रद्धांजली वाहणारे खाकाळ कुटुंब आज समाजासाठी आदर्श ठरत आहे.

या स्तुत्य आणि प्रेरणादायी उपक्रमाचे अंभोरा गावासह परिसरात सर्वत्र कौतुक होत असून, अशा उपक्रमांतून समाजात सकारात्मक बदल घडतो, अशी भावना ग्रामस्थांमधून व्यक्त होत आहे. वडिलांच्या दशक्रिया विधी निमित्त कुटुंबीयांनी ज्ञानेश्वरी पुस्तकाचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी बापू ओव्हाळ नामदेव थोरात शंकर खाकाळ राहुल खाकाळ व इतर उपस्थित होते.

# तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाच्या विद्याशाखेचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**तळा प्रतिनिधी :** तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे बालविकास व प्राथमिक विद्यामंदिर, गो म वेदक विद्यामंदिर आणि कला-वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय तळाचे वार्षिक स्नेहसंमेलन कलादर्पण २०२५ उत्साहत पार पडले. दि १८, १९ व २० डिसेंबर २०२५ या कालावधीत वार्षिक स्नेह संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. दि १८ डिसेंबर रोजी गो म वेदक विद्यामंदिरचे विविध गुणदर्शन कार्यक्रम, १९ डिसेंबर रोजी बालविकास व प्राथमिक विद्यामंदिर तर २० डिसेंबर रोजी कला-वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाचे विविध गुणदर्शन कार्यक्रम पार पडले. दिनांक १८ डिसेंबर रोजी प्रमुख अतिथी म्हणून उद्योजक योगेश कनकोशे तर उद्घाटक मंगेश देशमुख, अध्यक्ष चंद्रकांत



रोडे, दिनांक १९ डिसेंबर रोजी प्रमुख अतिथी माणगाव तालुका एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन श्रीनिवास बेंडखळे, डॉ सतीश वडके कार्यक्रमाचे अध्यक्ष पत्रकार पुरुषोत्तम मुळे, दिनांक २० डिसेंबर रोजी सेवानिवृत्त अधिकारी राजन देशमुख, भारतश्री सागर कातुर्डे तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महेंद्रशेठ कजबजे यांची उपस्थिती होती. वार्षिक स्नेह संमेलनासाठी संस्थेचे विश्वस्त मारोती शिर्के गुरुजी, अध्यक्ष चंद्रकांत रोडे, उपाध्यक्ष पुरुषोत्तम मुळे, सचिव मंगेश देशमुख, गो म वेदक विद्यामंदिरचे चेअरमन महेंद्रशेठ कजबजे, पन्हेळी हायस्कूलचे चेअरमन श्रीराम कजबजे, कार्यकारी मंडळाचे सदस्य महादेव बैकर, बी के पटेल, दीपकशेठ कोटिया, ॲड कौस्तुभ धामणकर, राजू सप्रे, संस्थेचे पदाधिकारी, मुख्याध्यापक दिलीप ढाकणे, सचिन भाटे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी आदर्श विद्यार्थी व आदर्श शिक्षकांचा सन्मान करण्यात आला. प्राथमिक विभागातून आदर्श विद्यार्थी सलमान रहाटविलकर व वैष्णवी शिंदे, तर आदर्श शिक्षिका म्हणून दीपाली पाटील यांचा गौरव करण्यात आला. गो म वेदक विद्यामंदिरचे आदर्श विद्यार्थी सोहम सुर्वे व शार्वी पवार तर आदर्श शिक्षक म्हणून विनायक महाडकर यांचा गौरव करण्यात आला. कला-वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाचे आदर्श विद्यार्थी कला शाखेतून संतोष पवार व श्रावणी शेळके, वाणिज्य श्रावणी शिंदे, व साईराज देशमुख,

विज्ञान अनुप साळुंखे व वैष्णवी खुटीकर तर आदर्श शिक्षक म्हणून प्रा डी टी आंबेगावे यांचा गौरव करण्यात आला. तसेच विविध क्रीडा स्पर्धा शालेय व सहशालेय उपक्रमांत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. मान्यवरांनी विविध उपक्रमात यश संपादन केलेले व आदर्श विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.१८ व २० डिसेंबर रोजी फनी गेम्स व अंताक्षरी तर १९ डिसेंबर रोजी आनंद मेळावा व वेशभूषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे निवेदन सुहास वावेकर, प्रा पाटील एन सी तर आभार मुख्याध्यापक दिलीप ढाकणे व प्रा कुळकर्णी बी एस यांनी मानले. यावेळी संस्था पदाधिकारी, शिक्षक, पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

# भूमिपुत्रांच्या छाताडावर विमानतळ : महेंद्रशेठ घरत

## दिबा हे राष्ट्रीय नेतेच : महेंद्रशेठ घरत

**दैनिक युवक आधार**

**उलवे, प्रतिनिधी :** "मंडळ आयोग आणि ओबीसींच्या लढ्यात दिबा अग्रणी होते. साडेबारा टक्के जमिनीचा कायदा देशभर लागू झाला दिबांच्या आंदोलनांमुळेच, १९८४ च्या आंदोलनात पाच हुतात्मे झाले. त्यांच्या बलिदानामुळे. सिडकोचा डोलारा भूमिपुत्रांमुळेच उभा आहे. शेतकऱ्यांच्या जमिनी १५ हजार रुपये एकरी सिडकोने घेतल्या. त्याच जमिनीवर अब्जावधी रुपये सिडको आज कमावतेय. भाजप हे संधीसाधू राजकारण करतेय; परंतु दिबांच्या नावाबाबत जो चालढकलपणा सुरू



आहे तो सर्वसामान्य भूमिपुत्र सहन करणार नाही. त्यामुळे आम्हा सर्वांची अस्मिता, अभिमान फक्त दिबाच!"

महेंद्रशेठ पुढे म्हणाले, "दिबा हे अतिशय साधे आणि नि:स्वार्थी जीवन जगले. हातावर पोट असणाऱ्या ग्रामस्थांनी त्यांचे घर बांधले. राज्यात, देशात जिथे जिथे सर्वसामान्यांवर सरकारने अन्याय-अत्याचार केला तेव्हा दि. बा. पाटील साहेब पेटून उठले. भूमिपुत्रांचे तर ते तारणहार आहेत. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ हे भूमिपुत्रांच्या छाताडावर वसले आहे. भूमिपुत्रांच्या असीम त्यागामुळेच विमानतळ साकारलेय. कारण भूमिपुत्रांनी फक्त जमिनीच दिल्या नाहीत तर घरादारांवर तुळशीपत्र ठेवले. दिबांमुळेच भूमिपुत्रांना काही अंशी न्याय मिळाला, जागतिक पातळीवर जे काही नेते समाजासाठीच जगले, त्यात दिबांचे नाव आघाडीवर असेल. दिबा हे राष्ट्रीय नेतेच आहेत आणि त्यांचेच नाव विमानतळाला हवे, त्यामुळे भूमिपुत्र प्रकल्पग्रस्तांच्या सहनशीलतेचा सरकारने अंत पाहू नये," असे आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि कॉंग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत गव्हाण येथे म्हणाले. त्यांच्या हस्ते ४० प्लस क्रिकेट टुर्नामेंटचे उद्घाटन शनिवारी झाले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी उद्योजक मनोज फडकर, जय श्रीराम ४० प्लस क्रिकेट क्लब गव्हाण आणि ग्रामस्थ उपस्थित होते. तसेच उपसरपंच चषक, पाले-उरण चषकाचे उद्घाटनही महेंद्रशेठ घरत यांच्या हस्ते झाले. यावेळी कॉंग्रेसचे तालुका अध्यक्ष विनोद म्हात्रे, आवरे सरपंच निराबाई पाटील, उरण युवक अध्यक्ष नितेश पाटील, पिरकोन सदस्य मंगेश म्हात्रे, आर. बी. म्हात्रे, रामचंद्र म्हात्रे, आनंद ठाकूर, राजेंद्र भगत, संजय म्हात्रे, विजय म्हात्रे आदी उपस्थित होते.सूत्रसंचालन सुनील वर्तक सर यांनी केले. आयोजक माजी उपसरपंच समाधान म्हात्रे आणि सहकारी होते.



**रायगड जिल्ह्यातील खोपोली नगरपरिषद निवडणुकीचा आज निकाल लागला. महायुतीच्या नगराध्यक्ष पदाचे उमेदवार कुलदीपक शेंडे बहुमताने निवडून आले.तसेच भारतीय जनता पार्टीचे ८ उमेदवारांपैकी ४ उमेदवार निवडून आले.विक्रम साबळे,किशोर पाटील,प्रतिक्षा रिटरेकर व अल्पसंख्यांक समाजाची महिला उमेदवार सानिया शेख सह सर्व उमेदवार बहुमताने निवडून आले.यावेळी विजयाचा जल्लोष साजरा करताना भाजपा उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाशजी कोळी,मा.ज्येष्ठ नगरसेवक तथा खोपोली निवडणूक निरीक्षक एडव्होकेट प्रकाशजी बिनेदार,माजी नगराध्यक्ष सुनीलभाई घरत,भारतीय जनता पार्टी अल्पसंख्यांक मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष तथा खोपोली अल्पसंख्यांक प्रभारी सय्यद अकबर,भाजपा खोपोली शहराध्यक्ष अजय इंगूलकर आदी महायुतीचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.भारत माता की जय..वंदे मातरम..भारतीय जनता पार्टीचा विजय असो.**

**( दैनिक युवक आधार )**

# वार्ड क्रमांक ४ अ मध्ये भाजपचा विजय

## रेखा नितीन चौदंते ७२४ मतांनी विजयी

**दैनिक युवक आधार**

**योगेश चौदंते :** नगरपालिका निवडणुकीतील वार्ड क्रमांक ४ अ मधून भाजपच्या उमेदवार रेखा नितीन चौदंते यांनी ७२४ मतांच्या फरकाने दणदणीत विजय मिळवला आहे. निवडणूक निकाल जाहीर होताच भाजप कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.मतमोजणीअंती रेखा नितीन चौदंते यांनी प्रतिस्पर्धी उमेदवारांवर निर्णायक आघाडी घेत विजय निश्चित केला. त्यांच्या विजयामुळे वार्ड क्रमांक ४ अ मध्ये भाजपचे वर्चस्व अधिक मजबूत झाले आहे. विजयानंतर बोलताना रेखा



नितीन चौदंते यांनी मतदारांचे आभार मानले असून, "वार्डच्या सर्वांगीण विकासासाठी आणि नागरिकांच्या मूलभूत समस्या सोडवण्यासाठी प्राधान्याने काम करणार," असा विश्वास व्यक्त केला.या विजयाबद्दल भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी फटाके फोडून, मिठाई वाटून आनंद साजरा केला.

# पेण नगराध्यक्ष पदावर भाजपाचीच मोहोर; प्रितम पाटील यांची नगराध्यक्ष पदाची विजयाची हॅट्रीक

**दैनिक युवक आधार**

**पेण/दीपक लोके :** पेण नगर परिषदेच्या निवडणुकीचा कौल आज अखेर भाजपच्या जाइंट किलर उमेदवार प्रितम ललित पाटील यांनी आम्ही पेणकर आघाडीच्या रिया धारकर यांना धोबीपछाड देत पेणमध्ये आम्ही सत्तेचे दावेदार असल्याचे तिस-यांदा या निवडणुकीत सिद्ध केले. जनता जनार्दनाचे प्रेम आपुलकी जिव्हाळा व शहराच्या सर्वांगीण विकासासाठी मतदारांनी नगराध्यक्ष पदासाठी झालेले मतदान एकुण २३ हजार ८४५ पैकी प्रितम पाटील यांना १४ हजार २७३ मते मिळाली तर आम्ही पेणकर आघाडीच्या उमेदवार रिया धारकर यांना ८ हजार ४१२ मते तर कॉंग्रेस पक्षाच्या उमेदवार नंदा म्हात्रे फक्त ६८७ मते मिळाली नोटाला ४७३ मते अशा पडलेल मतदानात. भाजपच्या प्रितम पाटील ५ हजार ८६१ मतांनी विजयी होऊन तिसऱ्यांदा नगराध्यक्ष



पदावर विराजमान होत आहेत. विशेष म्हणजे रायगड जिल्ह्यातील भाजपचा एकमेव नगराध्यक्ष पदाचे विजयी उमेदवार म्हणून त्यांनी पक्षश्रेष्ठींची शाबासकी मिळविण्यासाठी पात्र ठरलेल्या आहेत. नगरपरिषदेच्या १२प्रभागातील महायुतीचे ६ नगरसेवक बिनविरोध निवडून आले होते. यामध्ये ३ भाजपा आणि ३ राष्ट्रवादी कॉंग्रेस असे समीकरण होते. उर्वरित १८ जागासाठी आज झालेल्या मतमोजणीत भाजप ९जागावर तर राष्ट्रवादी २जागावर अशा ११जागावर भाजपा राष्ट्रवादी महायुतीने जिंकल्या आहेत. तर आम्ही पेणकर आघाडीला २ जागा,पेण नगर विकास आघाडीला ३ जागा, शिवसेना उबाठा गट १तर शिवसेना शिंदे गट १ अशा विरोधकांनी १८पैकी ७ जागावर विजय मिळवला आहे.

**प्रभाग निहाय विजयी उमेदवार**

1 अ कलावती पाटील -भाजप

ब संतोष शृंगारपुरे पेण नगर विकास आघाडी

2 अ पल्लवी कालेकर .. भाजप

ब प्रवीण शंकर पाटील आम्ही पेणकर आघाडी

3 अ सुजाता डाकी पेण नगर विकास आघाडी

ब संजय म्हात्रे.. पेण नगर विकास आघाडी

4 अ अरुणा पाटील. मशाल, उबाठा शिवसेना

ब भूषण कडू..शिंदे गट शिवसेना धनुष्य

5 अ अंजली जोगळेकर भाजप

6 अ संगीता लाड... भाजप

ब आनंद जाधव.. राष्ट्रवादी

7 अ आफ्रिन अखवारे भाजप

ब कृष्णा भोईर सद्दाम आम्ही पेणकर आघाडी

8 अ जसवीन पाटील.. भाजप

ब अनिरुद्ध पाटील ...भाजप

9 अ निवृत्ती पाटील.. राष्ट्रवादी

अशाप्रकारे १८जागांचा मतमोजणीत निकाल जाहीर झाला आहे.या सर्व विजयी व बिनविरोध उमेदवारांना निवडणूक अधिकारी तथा पेण तहसीलदार तानाजी शेजाळ आणि सहाय्यक अधिकारी अभिषेक पराडकर यांच्या हस्ते विजयाचे प्रमाणपत्र देऊन सन्मानीत करण्यात आले

**बिनविरोध उमेदवार**

1)अभीराज कडू भाजपा

2)सुशीला ठाकूर राष्ट्रवादी

3)दीपक गुरव राष्ट्रवादी

4)वसुधा पाटील राष्ट्रवादी

5)मालती म्हात्रे भाजप

6)स्मिता माळी भाजप

निवडणुकीचा माहोल एकंदरीत भाजपाच्या बाजूने झुकला असला तरी विरोधकांनी मिळविलेली मतांची आकडेवारी पहाता भाजपसाठी हे सोपं आव्हान नव्हते हे चित्र मतदारांनी मतपेटीतून दाखवून दिले.

## भाजपा राष्ट्रवादी महायुती २४ पैकी १७ तर विरोधी गटाला ७ जागावर समाधान..

# कुणाल पाटील युवा सामाजिक संस्था पागोटे आयोजित भव्य सोलो नृत्य स्पर्धा २०२५ दणक्यात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर/उरण प्रतिनिधी :** शनिवार दिनांक २०डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी ७ वाजता रा.जि.प. शाळा पागोटे तालुका उरण या ठिकाणी कुणाल पाटील युवा सामाजिक संस्था पागोटे यांच्या तर्फे भव्य दिव्य अशी राज्य स्तरीय सोलो नृत्य स्पर्धा संपन्न झाली.शिवसेनेचे माजी आमदार मनोहर शेठ भोईर यांच्या उपस्थितीत छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला मानवंदना करून हुतात्म्यांच्या पुतळ्यांना अभिवादन करून कार्यक्रमाला सुंदर सुरुवात झाली.युवा पागोटे सरपंच कुणाल पाटील,शिवसेना शाखाप्रमुख महेंद्र पाटील, सतीश पाटील, मयूर पाटील , प्रणित पाटील, नितीन पाटील ,करिष्मा पाटील (उपसरपंच ) सरपंच कुणाल पाटील यांच्या सुविद्य पत्नी प्रेरणा कुणाल पाटील, अरुण पाटील, चाणजे सरपंच अजय म्हात्रे, कुणाल पाटील युवा सामाजिक संस्थेचे सर्व कार्यकर्ते व पदाधिकारी यांची उपस्थिती कार्यक्रमासाठी लाभली.

महाराष्ट्रातून विविध ठिकाणाहून संभाजी नगर, नाशिक, वेंगुर्ले, अलिबाग,पेण माणगाव,उरण , बदलापूर इत्यादी ठिकाणांहून आपला नृत्याविष्कार सादर करण्यासाठी स्पर्धक सहभागी झाले होते.मा. मनोहर शेठ भोईर यांनी आपल्या मनोगतातून कुणाल पाटील



यांच्या सामाजिक कार्यातील असलेल्या योगदानाबद्दल गौरवोद्गार काढले. तसेच त्यांना प्रत्येक कार्यात आपला सपोर्ट राहील असे अश्वस्त करून त्यांना शुभेच्छा दिल्या.

एकापेक्षा एक नृत्याविष्कार सादर झाले.रोमांचक, दिलखेच,भावनेला स्पर्श करणारे नृत्याविष्कार स्पर्धकांनी सादर केले. महिलांची आवडीची मानाची पैठणीचा लकी ड्रॉ काढण्यात आला त्यातून १० पैठण्या पागोटे व पागोटे बाहेरील महिला विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते देण्यात आल्या.टिव्ही शो ला सादरीकरण केलेल्या नृत्य कलाकारांनी या स्पर्धेत आपली कला सादर करुन प्रेक्षकांना खिळवून ठेवले. या सोलो नृत्य स्पर्धेचे परीक्षण सोनू सर व अमृत सर यांनी केले.

या स्पर्धेतील विजेते पहिल्या गटातून इशिता बरवड पुणे, हर्ष पवार मुंबई, दुसऱ्या गटात घनश्याम सोनवले बदलापूर आणि तिसऱ्या गटात आर्या नारंगीकर उरण, दुर्वा झावरे अलिबाग ,दृष्टी ठाकूर या स्पर्धकांनी बाजी मारली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आपल्या खड्या आवाजात आणि सुंदर भाषा शैलीत अतिश पाटील यांनी केले.

कुणाल पाटील या युवा सरपंचाने सामाजिक कामातून त्यांनी आपली ओळख निर्माण केली आहे. पागोटे गावात ग्रामपंचायतीच्या माध्यमातून अनेक आरोग्य शिबिरे व अनेक उपक्रम यशस्वीरीत्या राबवले आहेत .त्यामुळे नेहमीच अशा कार्यक्रमांमधून युवा पिढीला आपल्या कलेचा अविष्कार सादर करण्यासाठी एक प्रकारचा व्यासपीठ कुणाल पाटील या युवकाकडून मिळत आहे. याबद्दल कुणाल पाटील यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.कुणाल पाटील यांच्या विवाह दिनानिमित्त या कार्यक्रमातुन त्यांना शुभेच्छा ही देण्यात आल्या.

## थोडक्यात

### पेण नगरपरिषद निवडणुकीत भाजप राष्ट्रवादी एक हाती सत्ता




**दैनिक युवक आधार**
**कपिल पाटील प्रतिनिधी :** मंगळवार दि.०२/१२/२०२५ रोजी पार पडलेल्या नगरपंचायती निवडणुकांचा निकाल आज रविवार दि.२१/१२/२०२५ रोजी जाहीर झाला.त्यामध्ये पेण नगरपरिषदेचा निकाल हा भाजप व राष्ट्रवादी (अजितपावर गट) यांच्याबाजूने गेला. भाजपच्या गत विजेत्या नगरसेविका प्रीतम पाटील यांनी पुन्हा एकदा अध्यक्ष पदावर आपलं नाव कोरल. तसेच काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्या नंदा म्हात्रे यांना मतदारांनी पूर्णपणे नापसंती दर्शउन फक्त६८७ मतांवर समाधान मानावं लागलं.प्रीतम पाटील यांनी मागील वर्चस्व कायम ठेऊन तब्बल१४२७३मजल मारून पुन्हा एकदा लोकांच्या मनावर राज्य प्रस्थापित केलं. ज्यांनी ज्यांनी मतदानाचा हक्क बजावला व पुन्हा विजयाची माळ गळ्यात दिली त्या सर्व मतदारांचे आभार व्यक्त केले.

### विचुंबे येथे आढळला अनोळखी मृतदेह



**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर :** दिनाक 17/10/2025 रोजी 18:45 वाजताचे सुमारास विचुंबे गावात थॉमस विदयालयाजवळ असले मोकळे प्लॉटमध्ये ता पनवेल जि रायगड येथे अनोळखी बेवारस मृतदेह आढळून आला आहे वर्णन- वय अंदाजे 40 वर्श अंगाने किरकोळ, चेहरा उभट केस व दाढी काळे, नाक सरळ, व मोठे, डोळे काळे, अंगात नेसणेस चौकडा फुल बाहयाचा षर्ट निळे रंगाची इलेस्टीक अंडरपॅन्ट, निळे रंगाची जिन्स पॅट, सदर व्यक्तीस ओळखत असल्यास खान्देश्वर पोलीस स्टेशन चे उपनिरीक्षक शैलेश भद्रे 98506 41629 यांच्याशी संपर्क करावा

### १६ वर्षीय तरुणीस कोणीतरी अज्ञात इसमाने फुस लावुन नेले पळवून



**दैनिक युवक आधार**
**पनवेल, प्रतिनिधी :** पनवेल जवळील असुडगाव येथे राहणाऱ्या १६ वर्षीय तरुणीस कोणीतरी अज्ञात इसमाने फुस लावुन दिनांक 03/11/2025 रोजी पळवून नेल्याची तक्रार खान्देश्वर शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे . सदर तरुणीचे नाव रोजी खातुन समसुद्दीन मन्सुरी, वय 16 वर्षे 10 महिने 03 दिवस, उंची 5 फुट रंग सावळा, अंगाने सडपातळ, अंगात नेसुन निळी जिन्स, दुपट्टा व निळ्या रंगाचा टॉप त्याव पांढ-या रंगाचे टिपके, नाक सरळ, चेहरा उभट, केस काळे लाम डोळे काळे मध्यम, भाशा भोजपुरी व हिंदी बोलते या तरुणीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी खान्देश्वर शहर पोलीस ठाणे किंवा पोलीस उपनिरीक्षक शैलेश भद्रे 98506 41629 यांच्याशी संपर्क साधावा असे आव्हान करण्यात आले आहे

### रोटरी पनवेल फेस्टिवलचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल प्रतिनिधी :** कर्नाळा स्पोर्ट्स अकॅडमी मैदान, पनवेल येथे रोटरी क्लब ऑफ पनवेल आणि रोटरी फाऊंडेशन पनवेल आयोजित रोटरी पनवेल फेस्टिवलचे आयोजन 22 डिसेंबर ते 31 डिसेंबर रोजी सायंकाळी चार ते रात्री 10 वाजेपर्यंत करण्यात आले आहे.दरवर्षी रोटरी पनवेल फेस्टिवलचे आयोजन पनवेल परिसरात केले जाते. दहा दिवसांच्या या रंगतदार दिवसांमध्ये आनंद, मजा आणि उत्साह असतो. जवळपास दोन लाखांपेक्षा अधिक नागरिक या फेस्टिवलला भेट देतात. यावेळी असंख्य आकर्षक, ग्राहकोपयोगी वस्तू खरेदीची संधी मिळते, चवदार खाद्यपदार्थांची मेजवानी रोटरी फेस्टिवलमध्ये असते तसेच आकर्षक करमणुकीच्या कार्यक्रमांची रेलचेल देखील असते. रोटरी पनवेल फेस्टिवलचे हे 28 व वर्ष असून कर्नाळा स्पोर्ट्स अकॅडमीचे मैदान, पनवेल येथे 22 डिसेंबर ते 31 डिसेंबर रोजी या फेस्टिवलचे आयोजन करण्यात आले आहे. या फेस्टिवलला उपस्थित राहून फेस्टिवलचा आनंद घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# व्यसनमुक्ती: एक नवी पहाट : सुनिताताई सवालाखे यांच्या दृष्टिकोनातून

**दैनिक युवक आधार**
**सचिन बन्सोड**
**जिल्हा प्रतिनिधी/ गोंदिया :** "व्यसन हे केवळ एका व्यक्तीचे नसते, तर ते संपूर्ण कुटुंबाला उद्ध्वस्त करणारे वादळ असते. पण जिद्द आणि योग्य मार्गदर्शनाची साथ मिळाली, तर या वादळातून सावरून पुन्हा सुखी संसार उभा करता येतो," असे प्रतिपादन सतनाम व्यसनमुक्ती केंद्राच्या सेंटर इंचार्ज सुनिताताई सवालाखे यांनी केले आहे.




व्यसनमुक्तीच्या क्षेत्रात गेल्या अनेक वर्षांपासून कार्य करताना सुनिताताईंनी अनेक कोलमडलेली कुटुंबे पुन्हा उभी राहिलेली पाहिली आहेत. त्यांच्या मते, व्यसन हा आजार आहे, गुन्हेगारी नाही. त्यामुळे व्यसनी व्यक्तीला तिरस्काराऐवजी प्रेमाची आणि उपचारांची गरज असते.

**व्यसनाधीनतेची कारणे आणि परिणाम**

आजच्या धावपळीच्या युगात मानसिक तणाव, बेरोजगारी किंवा चुकीची संगत यामुळे तरुण पिढी व्यसनाकडे वळत आहे. सुनिताताई सांगतात की, जेव्हा घरातील एक व्यक्ती व्यसनाच्या आहारी जाते, तेव्हा त्याचा सर्वाधिक त्रास घरातील महिला आणि मुलांना होतो. आर्थिक चणचण, मानसिक छळ आणि सामाजिक प्रतिष्ठा धुळीस मिळणे, असे अनेक गंभीर परिणाम यामुळे भोगावे लागतात.

**सतनाम केंद्राची भूमिका आणि उपचार पद्धती**

सतनाम व्यसनमुक्ती केंद्र केवळ औषधोपचार करण्यावर भर देत नाही, तर रुग्णाचा मानसिक परिवर्तनावर काम करते. सुनिताताईंच्या मार्गदर्शनाखाली केंद्रात खालील बाबींवर विशेष लक्ष दिले जाते:

समुपदेशन (Counsel-ing): रुग्णाच्या मनातील भीती आणि नैराश्य दूर करण्यासाठी नियमित कौन्सिलिंग केले जाते.

शिस्तबद्ध जीवनशैली: योगासने, प्राणायाम आणि ध्यानधारणेच्या माध्यमातून रुग्णाचे मन शांत ठेवण्याचा प्रयत्न केला जातो.

कौटुंबिक सुसंवाद: व्यसनमुक्तीनंतर रुग्णाला समाजात पुन्हा सन्मानाने जगता यावे, यासाठी त्याच्या कुटुंबाशीही चर्चा केली जाते.

**सुनिताताईंचा संदेश**


सुनिताताई सवालाखे या कार्यात अत्यंत संवेदनशीलपणे काम करतात. त्या म्हणतात, "केंद्रातून बाहेर पडणारा प्रत्येक रुग्ण जेव्हा आपल्या कुटुंबात आनंदाने रमतो, तेव्हाच आमच्या कष्टाचे फळ मिळते. व्यसन सोडून 'व्यसनमुक्त' होणे ही केवळ प्रक्रिया नाही, तर तो एक पुनर्जन्म आहे."

गोंदिया जिल्ह्यातील आणि परिसरातील ज्या कुटुंबांमध्ये व्यसनाची समस्या आहे, त्यांनी न घाबरता किंवा न लाजता मदतीसाठी पुढे यावे, असे आवाहनही त्यांनी या निमित्ताने केले आहे.

"व्यसन सोडा, आयुष्य जोडा!"

## रामबाग उद्यानाचा सोमवारी वर्धापनदिन सोहळा

**दैनिक युवक आधार**
**पनवेल(प्रतिनिधी) :** दुबईतील 'मिरॅकल गार्डन' च्या धर्तीवर पनवेल तालुक्यातील न्हावे खाडी येथील श्री म्हसेश्वर परिसरात असलेल्या 'रामबाग' या निसर्गरम्य उद्यानाच्या तृतीय वर्धापनदिन सोहळ्यानिमित्त सोमवार दिनांक २२ डिसेंबर रोजी श्री. सत्यनारायण महापूजा व सांस्कृतिक कार्यक्रम होणार असून माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्ष निमित्ताने विशेष सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्याला प्रमुख मान्यवर म्हणून माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, खासदार धैर्यशील पाटील, माजी खासदार डॉ. संजीव नाईक, माजी मंत्री व आमदार रवीशेठ पाटील, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, कोकण म्हाडाचे माजी सभापती



बाळासाहेब पाटील यांच्यासह अनेक मान्यवरांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

महाराष्ट्राच्या नावलौकिकात भर टाकणारी अशी 'स्वर्गसुख आनंद देणारी रामबाग' साकारली आहे. १४ एकर जागेतील या 'रामबाग' उद्यानात भव्य आणि सुखद प्रवेशद्वार, निसर्गरम्य हिरवळीसह विविध प्रकारच्या फुलझाडांच्या असंख्य विविध रचना, तलाव, विद्युत रोषणाई, पदपथ, चिरेबंदी बांधकाम, आसन व्यवस्था, लहान मुलांसाठी खेळणी, पाळणे, डबल हर्ट आणि स्टोन सेल्फी पॉईंट, मचवा, पाण्याचे कारंजे, अशा सर्व बाबी आकर्षक आणि मनमोहक आहेत. सायंकाळी या उद्यानाचे रूप बदलते, त्यावेळी असणारी विद्युत रोषणाई अक्षरशः डोळ्याचे पारणे फिटणारी आहे. त्यामुळे राज्यातील निसर्गप्रेमी या ठिकाणी मोठ्या संख्येने भेट देत आहेत. न्हावेखाडी येथे म्हसेश्वर मंदिर येथे अतिसुंदर असलेल्या या रामबाग उद्यानाच्या वर्धापनदिनानिमित्त सायंकाळी ५. ३० वाजता श्री. सत्यनारायण महापूजा व महाप्रसाद तर रात्री ०८ वाजता पप्पू सूर्यराव, स्टेप आर्ट इंटरटेन्मेन्ट निर्मित व सनी संते प्रस्तुत 'हिच खरी आगरी कोळ्यांची दौलत' हा पारंपरिक लोकगीते व कोळीगीतांचा बहारदार कार्यक्रम होणार असून प्रवेश विनामूल्य आहे. या कार्यक्रमाचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन रामबाग व्यवस्थापन कमिटीचे अध्यक्ष सागर ठाकूर, श्री. म्हसेश्वर मंदिर कमिटी अध्यक्ष सि. एल. ठाकूर, न्हावे ग्रामपंचायतीचे सरपंच विजेंद्र पाटील यांनी केले आहे.

## 22 डिसेंबरचा मोर्चा स्थगित

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल : वार्ताहर**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला दिबा पाटील यांचे नाव लागावे यासाठी काढण्यात येणारा 22 डिसेंबरचा मोर्चा स्थगित करण्यात आलू असल्याची माहिती 27 गाव प्रकल्पग्रस्त समितीचे अध्यक्ष नंदराज मुंगाजी, सचिव प्रेम पाटील यांनी दिली आहे. 25 डिसेंबर रोजी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून विमान उड्डाण होणार आहे. मात्र अद्यापही या विमानतळाला दिबा पाटील यांचे नाव दिलेले नाही. त्यामुळे भूमिपुत्र, प्रकल्पग्रस्त, शेतकरी, दिबाप्रेमी नाराज आहेत. नवी मुंबईतून विमान उड्डाण होण्यापूर्वी 22 डिसेंबर रोजी विराट मोर्चा काढण्यात येणार होता. या मोर्चाची तयारी देखील झाली होती. 27 गाव प्रकल्पग्रस्त समितीच्या माध्यमातून पनवेलमधील हजारो नागरिक यात सहभागी होणार होते. खासदार बाळ्यामामा म्हात्रे यांच्या माध्यमातून या आंदोलनाची हाक देण्यात आली होती. मात्र आचारसंहितेमुळे हे आंदोलन स्थगित करण्यात आली असल्याची माहिती देण्यात आली आहे. यापुढे आचारसंहिता संपल्यानंतर विमानतळाला दिबा पाटील यांचे नाव लागावे यासाठी मोर्चा काढण्यात येणार असल्याची माहिती नंदराज मुंगाजी यांनी दिली.

## ग्राहक संरक्षण कायदा व चळवळीबाबत महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे प्रबोधन

**दैनिक युवक आधार**
**राहुल कुलकर्णी निफाड :** ग्राहक पंचायत महाराष्ट्रच्या वतीने नाशिक जिल्हा व मराठा विद्या प्रसारक मंडळ संचलित कर्मवीर गणपत दादा मोरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, निफाड येथे ग्राहक संरक्षण कायदा व ग्राहक चळवळ या विषयावर महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी प्रबोधनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यक्रम दि. १९ डिसेंबर रोजी संयुक्त विद्यमाने उत्साहात पार पडला.विद्यार्थ्यांचे उज्ज्वल भविष्य घडवण्यासाठी त्यांना जागरूक ग्राहक बनवणे हा या कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश



होता. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व ग्राहक गीताने करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा. कोटकर मॅडम यांनी केले.कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते डॉ. संजय पाटील (जिल्हाध्यक्ष, ग्राहक पंचायत महाराष्ट्र, नाशिक) यांनी ग्राहक संरक्षण कायदा २०१९ मधील महत्त्वाच्या तरतुदी, ग्राहक म्हणून विद्यार्थ्यांचे हक्क व कर्तव्ये याविषयी सोप्या व समजेल अशा भाषेत मार्गदर्शन केले. यावेळी ग्राहक पंचायत महाराष्ट्र, निफाड तालुका संघटक श्री. किरण जोशी यांनी ऑनलाइन व्यवहारांमुळे विद्यार्थ्यांना होणारे संभाव्य तोटे, घ्यावयाची काळजी तसेच ग्राहक संरक्षण सुधारित कायदा २०१९ अंतर्गत तक्रार नोंदवण्यासाठी असलेल्या ई-दाखिल या ऑनलाइन पोर्टलची माहिती व त्याचा वापर कसा करावा याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एन. शिंदे यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतात ग्राहक संरक्षण कायदा हा भारतातील ग्राहकांच्या हक्कांचे संरक्षण करणारा एक महत्त्वाचा कायदा असून, ग्राहकांच्या तक्रारींचे निराकरण करण्यासाठी मजबूत व्यवस्था उपलब्ध करून देतो, असे नमूद केले.या कार्यक्रमास ग्राहक पंचायत महाराष्ट्रचे डॉ. संजय पाटील, डॉ. राजेंद्र बागुल, श्री. वसंत दंडवते, श्री. विजय पाटील, श्री. प्रकाश जोशी, श्री. संदीप नगरकर, सौ. इंदिरा बागुल, सौ. सीमा डेर्ले तसेच महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. शेलार यांचे मोलाचे सहकार्य लाभले.


महाराष्ट्र शासन
अपर जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचे कार्यालय
जुने जकात घर, शहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१
दुरध्वनी क्र.:- ०२२- २२६१००१३ ई-मेल :- addcollmumbai@gmail.com

जाहिर नोटीस

श्री. सुनील तुलसी यादव ------------ अपिलार्थी
विरुध्द
सहायक महापालिका आयुक्त जी/दक्षिण विभाग व इतर ०३ ------------- उत्तरार्थी

प्रति,
हीरालाल रामजीत मुल्लाह,
खोली क्र. ७-१४/१६, साने गुरुजी नगर,
बी कमिटी जी.बी.एस मार्ग, सातरस्ता,
धोबीघाट, महालक्ष्मी, मुंबई ४०० ०११. -----------(उत्तरार्थी क्र.४)

सदर जाहिर नोटीसीद्वारे आपणांस सुचित करण्यात येते की, अपिलार्थी यांनी महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुर्नविकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३५ अंतर्गत मा.अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर, पहिला मजला, जुने जकात घर, शहिद भगतसिंग रोड, फोर्ट, मुंबई ४००००१ येथे **साने गुरुजी नगर सहकारी गृहनिर्माण संस्थेमधील झो.क्र. १६४ या झोपडीवर पात्र करणेकामी अपिल अर्ज दाखल केला आहे. प्रश्नांकित झोपडी / अपिलार्थी यांनी दावा केलेली झोपडी आपणाकडून खरेदी केल्याचे दिसून येत असल्याने सदर अपील प्रकरणात आपणांस उत्तरार्थी क्र. ०४ केले आहे.** प्रकरणी दि. ०३.१२.२०२५ रोजीचे सुनावणीमध्ये मा.अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर यांनी आपणांस पुढील सुनावणी तारखेबाबत जाहिर नोटीसीद्वारे अवगत करणेचे निर्देश दिले आहेत.

सदर जाहिर नोटीसीद्वारे आपणांस सुचित करण्यात येते की, सदर प्रकरणामध्ये आपण उत्तरार्थी क्र.०४ असून, **दि. ०७/०१/२०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता** मा.अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर यांचे दालनात सुनावणी आयोजित केलेली आहे. तरी सदर सुनावणीस आपण उपस्थित / हजर राहून, आपली बाजू मांडावी. उपरोक्त नमूद केलेल्या दिवशी आपण स्वतः अथवा आपले प्राधिकृत प्रतिनिधी उपस्थित न राहिल्यास, आपणास काहीही सांगावयाचे नाही, असे गृहित धरुन प्रकरणी गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल, यांची नोंद घ्यावी.

AJITKUMAR CHANDRASEN BHATE
सहाय्यक महसुल अधिकारी
अपर जिल्हाधिकारी कार्यालय,
मुंबई शहर



महाराष्ट्र शासन
अपर जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचे कार्यालय
जुने जकात घर, शहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१
दुरध्वनी क्र.:- ०२२- २२६१००१३ ई-मेल :- addcollmumbai@gmail.com

जाहिर नोटीस

मोहम्मद फरीद शेख ------------ अपिलार्थी
विरुध्द
सहायक महापालिका आयुक्त जी/दक्षिण विभाग व इतर ०३ ------------- उत्तरार्थी

प्रति,
जैसवार लालता रामदेव,
जी-१, चाळ क्र. १४, साने गुरुजी नगर बी कमिटी,
जी.बी.सकपाळ मार्ग, सातरस्ता, धोबीघाट,
मुंबई ४०० ०११. -----------(उत्तरार्थी क्र.४)

सदर जाहिर नोटीसीद्वारे आपणांस सुचित करण्यात येते की, अपिलार्थी यांनी महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुर्नविकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३५ अंतर्गत मा.अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर, पहिला मजला, जुने जकात घर, शहिद भगतसिंग रोड, फोर्ट, मुंबई ४००००१ येथे **साने गुरुजी नगर सहकारी गृहनिर्माण संस्थेमधील झो.क्र. २४२ या झोपडीवर पात्र करणेकामी अपिल अर्ज दाखल केला आहे. प्रश्नांकित झोपडी / अपिलार्थी यांनी दावा केलेली झोपडी आपणाकडून खरेदी केल्याचे दिसून येत असल्याने सदर अपील प्रकरणात आपणांस उत्तरार्थी क्र. ०४ केले आहे.** प्रकरणी दि. ०३.१२.२०२५ रोजीचे सुनावणीमध्ये मा.अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर यांनी आपणांस पुढील सुनावणी तारखेबाबत जाहिर नोटीसीद्वारे अवगत करणेचे निर्देश दिले आहेत.

सदर जाहिर नोटीसीद्वारे आपणांस सुचित करण्यात येते की, सदर प्रकरणामध्ये आपण उत्तरार्थी क्र.०४ असून, **दि. ०७/०१/२०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता** मा.अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर यांचे दालनात सुनावणी आयोजित केलेली आहे. तरी सदर सुनावणीस आपण उपस्थित / हजर राहून, आपली बाजू मांडावी. उपरोक्त नमूद केलेल्या दिवशी आपण स्वतः अथवा आपले प्राधिकृत प्रतिनिधी उपस्थित न राहिल्यास, आपणास काहीही सांगावयाचे नाही, असे गृहित धरुन प्रकरणी गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल, यांची नोंद घ्यावी.

AJITKUMAR CHANDRASEN BHATE
सहाय्यक महसुल अधिकारी
अपर जिल्हाधिकारी कार्यालय,
मुंबई शहर



महाराष्ट्र शासन
अपर जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचे कार्यालय
जुने जकात घर, शहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१
दुरध्वनी क्र.:- ०२२- २२६१००१३ ई-मेल :- addcollmumbai@gmail.com

जाहिर नोटीस

श्री. चंद्रशेखर सिरसाई गोगी ------------ अपिलार्थी
विरुध्द
सहायक महापालिका आयुक्त जी/दक्षिण विभाग व इतर ०३ ------------- उत्तरार्थी

प्रति,
अरबीहसन हबीबुल्ला खान,
९३अ शक्ती नगर एस.आर.ए,
को.ऑ.हौ.सोसायटी -----------(उत्तरार्थी क्र.४)

सदर जाहिर नोटीसीद्वारे आपणांस सुचित करण्यात येते की, अपिलार्थी यांनी महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुर्नविकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३५ अंतर्गत मा.अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर, पहिला मजला, जुने जकात घर, शहिद भगतसिंग रोड, फोर्ट, मुंबई ४००००१ येथे **शक्ती नगर सहकारी गृहनिर्माण संस्थेमधील झो.क्र. ७३अ या झोपडीवर पात्र करणेकामी अपिल अर्ज दाखल केला आहे. प्रश्नांकित झोपडी / अपिलार्थी यांनी दावा केलेली झोपडी आपणाकडून खरेदी केल्याचे दिसून येत असल्याने सदर अपील प्रकरणात आपणांस उत्तरार्थी क्र. ०४ केले आहे.** प्रकरणी दि. ०३.१२.२०२५ रोजीचे सुनावणीमध्ये मा.अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर यांनी आपणांस पुढील सुनावणी तारखेबाबत जाहिर नोटीसीद्वारे अवगत करणेचे निर्देश दिले आहेत.

सदर जाहिर नोटीसीद्वारे आपणांस सुचित करण्यात येते की, सदर प्रकरणामध्ये आपण उत्तरार्थी क्र.०४ असून, **दि. ०७/०१/२०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता** मा.अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर यांचे दालनात सुनावणी आयोजित केलेली आहे. तरी सदर सुनावणीस आपण उपस्थित / हजर राहून, आपली बाजू मांडावी. उपरोक्त नमूद केलेल्या दिवशी आपण स्वतः अथवा आपले प्राधिकृत प्रतिनिधी उपस्थित न राहिल्यास, आपणास काहीही सांगावयाचे नाही, असे गृहित धरुन प्रकरणी गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल, यांची नोंद घ्यावी.

AJITKUMAR CHANDRASEN BHATE
सहाय्यक महसुल अधिकारी
अपर जिल्हाधिकारी कार्यालय,
मुंबई शहर



महाराष्ट्र शासन
अपर जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचे कार्यालय
जुने जकात घर, शहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१
दुरध्वनी क्र.:- ०२२- २२६१००१३ ई-मेल :- addcollmumbai@gmail.com

जाहिर नोटीस

सोपान गजानन घुगे ------------ अपिलार्थी
विरुध्द
सहायक महापालिका आयुक्त जी/दक्षिण विभाग व इतर ३ ------------- उत्तरार्थी

प्रति,
मल्हारी देवराज शिंदे,
सी/३८, गणेश नगर जे.आर.बोरीचा मार्ग,
जेकब सर्कल, मुंबई ४०० ०११. ------- (उत्तरार्थी क्र.४)

सदर जाहिर नोटीसीद्वारे आपणांस सुचित करण्यात येते की, अपिलार्थी यांनी महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुर्नविकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३५ अंतर्गत मा.अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर, पहिला मजला, जुने जकात घर, शहिद भगतसिंग रोड, फोर्ट, मुंबई ४००००१ येथे **गणेश नगर सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या परि-II मधील अ.क्र. १७ वर आपले नाव नमुद असून / आपणाकडुन खरेदी केलेली असून सदर संस्थेच्या परि II मधील अ.क्र १७ वरील आपले नाव कमी करून स्वतःचे नाव समाविष्ट करून पात्र करणेकामी अपिलार्थी यांनी अपील अर्ज दाखल केलेला असल्याने आपणांस उत्तरार्थी ०४ केलेला आहे.** प्रकरणी दि. ०३.१२.२०२५ रोजीचे सुनावणीमध्ये मा.अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर यांनी आपणांस पुढील सुनावणी तारखेबाबत जाहिर नोटीसीद्वारे अवगत करणेचे निर्देश दिले आहेत.

सदर जाहिर नोटीसीद्वारे आपणांस सुचित करण्यात येते की, सदर प्रकरणामध्ये आपण उत्तरार्थी क्र. ०४ असून, **दि. ०७/०१/२०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता** मा. अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर यांचे दालनात सुनावणी आयोजित केलेली आहे. तरी सदर सुनावणीस आपण उपस्थित / हजर राहून, आपली बाजू मांडावी. उपरोक्त नमूद केलेल्या दिवशी आपण स्वतः अथवा आपले प्राधिकृत प्रतिनिधी उपस्थित न राहिल्यास, आपणास काहीही सांगावयाचे नाही, असे गृहित धरुन प्रकरणी गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल, यांची नोंद घ्यावी.

AJITKUMAR CHANDRASEN BHATE
सहाय्यक महसुल अधिकारी
अपर जिल्हाधिकारी कार्यालय,
मुंबई शहर


## खोपोली प्रभाग क्र. ११ मध्ये 'साबळे पॅटर्न' यशस्वी

### भाजप महायुतीचे विक्रम साबळे व सानिया शेख यांचा दणदणीत विजय



**दैनिक युवक आधार**
**खोपोली वार्ताहर :** खोपोली नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या निकालात सर्वाधिक प्रतिष्ठेची ठरलेली निवडणूक म्हणजे प्रभाग क्र. ११. या प्रभागात मतदारांनी पुन्हा एकदा 'साबळे पॅटर्न'वर विश्वास दाखवत साबळे कुटुंबीयांप्रती आपली भावना मतांच्या रूपाने व्यक्त केली आहे.भाजप महायुतीचे नगरसेवक पदाचे उमेदवार विक्रम साबळे यांना १३५१ मते, तर सानिया शेख यांना १२०९ मते मिळाली. त्यांच्या विरोधात निवडणूक लढविणारे शेकापचे उमेदवार संतोष मालकर (५६६ मते) व शिल्पा मालकर यांना ७०३ मते मिळाली. या दोन्ही पती पत्नीचा निवडणूकित पराभव मोठ्या फरकाने झाल्याने शांतीनगर परिसरात फक्त साबळे पॅटर्नच चालते हे पुन्हा एकदा सिद्ध झाल्याची चर्चा जनतेत होत आहे.हा विजय 'सबका साथ, सबका विकास' या विचारधारेवर आधारित असून भाजप महायुतीच्या माध्यमातून शहरात सकारात्मक बदल घडत असल्याचे प्रतिपादन करण्यात आले. आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेंद्र थोरवे यांच्या मार्गदर्शनाखाली शहर व प्रभागाच्या विकासाला अधिक गती देण्यासाठी हे एक महत्त्वाचे पाऊल असल्याचे यशवंत शेठ यांनी सांगत माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर तसेच पक्ष संघटन, भाजप निवडणूक प्रभारी अॅड. प्रकाश बिनेदार, माजी नगराध्यक्ष सुनील घरत ,सय्यद अकबर ,महायुतीचे सर्व पदाधिकारी तसेच खोपोली शहर भाजप मंडळाचे मनापासून आभार हि मानले.हा विजयोत्सव सर्वसामान्य जनतेचा असून भाजप महायुतीवर मतदारांनी दाखविलेल्या विश्वासाचे प्रतीक आहे, असे ठाम मत यशवंत शेठ साबळे यांनी विजयानंतर शुभेच्छा स्वीकारताना व्यक्त केले.


सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करून मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# श्रीवर्धन नगर पालिका निवडणूक निकाल जाहीर

## अजित पवार गटाचे संख्याबळ, तर नगराध्यक्षपदी उबाठा गटाचा झेंडा

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी/अनिकेत मोहित :** श्रीवर्धन नगर पालिकेच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांनी स्पष्ट वर्चस्व राखत तब्बल १५ जागांवर विजय मिळवला आहे. भाजप २, तर शिवसेना (शिंदे गट) ला ३ जागांवर समाधान मानावे लागले आहे. मात्र, थेट नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) चे अतुल चौगुले यांनी २१९ मतांच्या फरकाने विजय मिळवत नगराध्यक्षपदावर आपला झेंडा फडकावला आहे.

नगरसेवक निवडणुकीत अजित पवार गटाकडे बहुमत असले, तरी नगराध्यक्षपद उबाठा गटाकडे गेल्याने श्रीवर्धनच्या राजकारणात नवे व वेगळे सत्तासमीकरण




निर्माण झाले आहे. त्यामुळे आगामी काळात नगर पालिकेतील सत्ताकारण, समन्वय आणि प्रशासनाची दिशा कशी राहणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

या निवडणुकीत दोन मंत्र्यांची प्रतिष्ठा पणाला लागली होती. बालविकास मंत्री व रायगडच्या आमदार आदितीताई तटकरे तसेच मंत्री आमदार भारतशेठ गोगावले यांनी या निवडणुकीसाठी विशेष लक्ष घातले होते. निवडणूक काळात आदितीताई तटकरे यांनी श्रीवर्धनमध्येच तळ ठोकून प्रचाराची धुरा सांभाळली होती. मात्र, इतक्या जोरदार प्रयत्नांनंतरही नगराध्यक्षपदाची जागा राखता न आल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.निवडणूक निकालानंतर विविध पक्षांच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण असून, शहराच्या विकासाच्या दृष्टीने येत्या काळात निर्णयप्रक्रिया कशी घडते, याबाबत उत्सुकता आहे.

**प्रभागनिहाय निकाल**

प्रभाग क्र. १ अ – अनंत गुरव (राष्ट्रवादी काँग्रेस – अजित पवार गट)

प्रभाग क्र. १ ब – शमा वैद्य (राष्ट्रवादी काँग्रेस – अजित पवार गट)

प्रभाग क्र. २ अ – हरिदास वाघे (राष्ट्रवादी काँग्रेस – अजित पवार गट)

प्रभाग क्र. २ ब – प्रगती वाघे (राष्ट्रवादी काँग्रेस – अजित पवार गट)

प्रभाग क्र. ३ अ – सलोनी मोहित (शिवसेना – शिंदे गट)

प्रभाग क्र. ३ ब – देवेंद्र भुसारे (शिवसेना – शिंदे गट)

प्रभाग क्र. ४ अ – सुप्रिया चोगले (भाजप)

प्रभाग क्र. ४ ब – संतोष वेश्वीकर (शिवसेना – शिंदे गट)

प्रभाग क्र. ५ अ – साक्षी पब्रेकर (राष्ट्रवादी काँग्रेस – अजित पवार गट)

प्रभाग क्र. ५ ब – प्रणील बोरकर (राष्ट्रवादी काँग्रेस – अजित पवार गट)

प्रभाग क्र. ६ अ – राजसी मुरकर (राष्ट्रवादी काँग्रेस – अजित पवार गट)

प्रभाग क्र. ६ ब – प्रसाद विचारे (राष्ट्रवादी काँग्रेस – अजित पवार गट)

प्रभाग क्र. ७ अ – शिवानी चौले (राष्ट्रवादी काँग्रेस – अजित पवार गट)

प्रभाग क्र. ७ ब – इफ्तिकार राजपुरकर (राष्ट्रवादी काँग्रेस – अजित पवार गट)

प्रभाग क्र. ८ अ – शबिस्ता सरखोत (राष्ट्रवादी काँग्रेस – अजित पवार गट)

प्रभाग क्र. ८ ब – समीर साठविलकर (राष्ट्रवादी काँग्रेस – अजित पवार गट)

प्रभाग क्र. ९ अ – बाळकृष्ण गोरनाक (राष्ट्रवादी काँग्रेस – अजित पवार गट)

प्रभाग क्र. ९ ब – प्रवीता माने (राष्ट्रवादी काँग्रेस – अजित पवार गट)

प्रभाग क्र. १० अ – गुलाब मांडवकर (राष्ट्रवादी काँग्रेस – अजित पवार गट)

प्रभाग क्र. १० ब – भावेश मांजरेकर (राष्ट्रवादी काँग्रेस – अजित पवार गट)

श्रीवर्धन नगर पालिकेच्या या निकालाने जिल्ह्याच्या राजकारणात नवे संकेत दिले असून, पुढील काळातील घडामोडींवर सर्वांचे लक्ष केंद्रित झाले आहे दरम्यान, या निवडणुकीच्या मतमोजणी प्रक्रियेदरम्यान पत्रकारांना मतमोजणी केंद्रात प्रवेश नाकारण्यात आल्याचा प्रकार घडला. या घटनेबाबत स्थानिक व जिल्ह्यातील सर्व पत्रकार मित्रांनी तीव्र निषेध व्यक्त केला. यासंदर्भात पत्रकारांनी निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार श्री. महेंद्र वाकलेकर यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी झालेल्या प्रकाराबद्दल दिलगिरी व्यक्त करत, भविष्यात अशा प्रकारची पुनरावृत्ती होणार नाही, असे स्पष्ट आश्वासन दिले.

## २५ वर्षांचा राष्ट्रवादीचा बालेकिल्ला कोसळला; १,११८ मतांनी शिवसेना-भाजप-आरपीआय महायुतीचा दणदणीत विजय!

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी खालापूर/संतोष शेवाळे :** खोपोली नगर परिषदेच्या नगराध्यक्षपदी शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार कुलदीपक शेंडे यांनी ऐतिहासिक विजय मिळवला आहे. तब्बल २५ वर्षांपासून राष्ट्रवादी काँग्रेसचा (अजित पवार गट) बालेकिल्ला मानल्या जाणाऱ्या खोपोली नगर परिषदेवर शिवसेना, भाजप आणि आरपीआय या महायुतीने भगवा फडकवला आहे.

या निवडणुकीत शिवसेना शिंदे गटाचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार कुलदीपक शेंडे यांना २०,४६९ मते, तर राष्ट्रवादी अजित पवार गटाचे उमेदवार डॉ. सुनील पाटील यांना १९,३५१ मते मिळाली. यामध्ये १,११८ मतांची आघाडी घेत कुलदीपक शेंडे विजयी झाले.

विजयानंतर प्रतिक्रिया देताना कुलदीपक शेंडे म्हणाले, "खोपोली नगर परिषद ही गेली २५ वर्षे राष्ट्रवादीचा बालेकिल्ला होती. मात्र शिवसेना, भाजप आणि आरपीआय महायुतीच्या माध्यमातून आम्ही येथे शिवसेनेचा भगवा फडकवला. या निवडीचे संपूर्ण श्रेय खोपोलीतील जनता, माझे नातेवाईक, निष्ठावंत कार्यकर्ते तसेच महायुतीतील सर्व घटकांना जाते."

ते पुढे म्हणाले, "प्रचारादरम्यान आम्ही जो विकासाचा अजेंडा मांडला होता, त्याच धर्तीवर काम करण्यात येईल. येणारी पाच वर्षे केवळ जनतेच्या विकासासाठी असतील, असा मी शब्द देतो," असेही त्यांनी स्पष्ट केले.

या विजयानंतर खोपोली शहरात महायुतीच्या कार्यकर्त्यांनी जल्लोष केला असून, नगरपरिषदेच्या राजकारणात मोठा बदल घडून आल्याचे चित्र आहे.

खोपोली नगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५

**विजयी उमेदवार नगराध्यक्ष पदाचे उमेदवार**

कुलदिपक शेंडे -( शिंदे गट ) विजयी

प्रभाग १ श्रुती पालांडे ( शिवसेना



शिंदे गट) मंगेश दळवी ( राष्ट्रवादी अजित पवार गट) प्रभाग २ अमित फाले ( शिवसेना शिंदे गट)मानसी काळोखे (शिवसेना शिंदे गट ) प्रभाग ३ मोरे सुवर्णा ( राष्ट्रवादी शरद पवार गट) अनिल सानप ( शिवसेना शिंदे गट ) प्रभाग ४ तेलवणे विनायक ( राष्ट्रवादी) प्रतीक्षा रेटरेकर. ( भाजपा) प्रभाग ५ गायकवाड हर्षदा ( राष्ट्रवादी अजित पवार) समीर मसुरकर ( राष्ट्रवादी अजित पवार)

प्रभाग ६ मयूरी शेलार ( शिवसेना शिंदे गट)

राहुल गायकवाड ( अपक्ष) प्रभाग ७ प्रशांत शेंडे ( राष्ट्रवादी अजित पवार गट ) ऐश्वर्या पाटील ( राष्ट्रवादी अजित पवार गट) प्रभाग ८ रूपाली जाधव ( शिवसेना शिंदे गट) जळगावकर रुक्साना ( शिवसेना शिंदे गट)

प्रभाग ९ गणेश सुतक. ( शेकाप) पाटील तसलीम ( शेकाप)प्रभाग क्र.१० -अनिता पवार ( शिंदे गट ) उज्वला महाडीक (शिंदे गट) हरिश काळे (शिंदे गट )

प्रभाग क्र ११ विक्रम साबळे ( भाजप) सानिया शेख (भाजप )प्रभाग क्र १२ निजामुद्दीन जळगांवकर (शेकाप)

विनिता कांबळी ( शेकाप)प्रभाग क्र.१३अविनाश किरवे (शिंदे गट )वंदना सावंत ( शिंदे गट )प्रभाग क्रमांक -१४

किशोर पाटील (भाजप)रेश्मा गायकवाड (शिंदे गटप्रभाग क्र.१५ श्वेला अहिर (राष्ट्रवादी)संदीप पाटील ( शिंदे गट)एकूण पक्षाचे विजयी उमेदवार शिंदे गट - १४

अजित पवार राष्ट्रवादी -७ अपक्ष -१ भाजप - ४ शेकापक्ष - ४ शरद पवार पक्ष -१

## जी .के .एस .महाविद्यालय खडवलीच्या विद्यार्थ्यांनी आंतरमहाविद्यालयीन बॉक्स क्रिकेट स्पर्धेत मिळवला विजय

**दैनिक युवक आधार**

**मुंबई (शांताराम गुडेकर) :** कल्याण येथील के.एम. अग्रवाल महाविद्यालय,यांच्यावतीने आंतरमहाविद्यालयीन बॉक्स क्रिकेट स्पर्धेचे आयोजन महाविद्यालयाच्या मैदानात केले होते.या बॉक्स क्रिकेट स्पर्धेतील अंतिम सामन्यात मैत्रेय बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे जी.के. एस.कला,वाणिज्य,व विज्ञान महाविद्यालय खडवली येथील विद्यार्थ्यांनी दणदणीत विजय मिळविला.या उल्लेखनीय कामगिरीसाठी महाविद्यालयाच्या क्रीडा शिक्षिका सौ.हर्षला विशे मॅडम व प्रशिक्षक श्री. बाळाराम चौधरी सर यांचे सक्षम मार्गदर्शन मिळाले.या स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांपैकी कुमार




प्रशांत मुकणे या विद्यार्थ्याने कॅप्टनची भूमिका उत्कृष्ट पणे पार पाडली.तसेच कु.निशांत दिनकर, कु. अजय भगत, कु. रोहित ठाकर, कुमार नमन लोगे, कु. मयुर लोणे, कुमार कु. लोणे, कु. वंश वारघडे या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी केली.

या कामगिरीमुळे महाविद्यालयाच्या संचालीका सौ.कविता शिकतोडे मॅडम, तसेच प्राचार्य डॉ.एस.जी.सागर सर,उप प्राचार्य प्रशांत तांदळे सर तसेच महाविद्यालयाचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी क्रीडा शिक्षक सौ.हर्षला विशे मॅडम,प्रशिक्षक श्री. बाळाराम चौधरी सर व विजयी विद्यार्थ्यांचे कौतुक व अभिनंदन केले.

## वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवारांचा दणदणीत विजय; नगरपरिषद व नगरपंचायतींमध्ये बहुजन शक्तीचा झेंडा

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी/प्रकाश गवारे :** राज्यातील विविध नगरपरिषद व नगरपंचायत निवडणुकांमध्ये वंचित बहुजन आघाडीने (VBA) उल्लेखनीय कामगिरी करत अनेक ठिकाणी विजय मिळवला आहे. सामाजिक न्याय, बहुजन सशक्तीकरण आणि फुले–शाहू–आंबेडकरी विचारांच्या बळावर लढलेल्या या निवडणुकांमध्ये वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवारांनी मतदारांचा विश्वास संपादन केला आहे. विजयी उमेदवारांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.वंचित बहुजन आघाडीचे खालील उमेदवार विजयी झाले आहेत हीवरखेड (अकोला) येथून सविता सुनील इंगळे, भूम (उस्मानाबाद) येथून रीना शिंदे, कंधार (नांदेड) येथून दिलीप देशमुख, तेल्हारा येथून कांहो पात्रा, भगूर (नाशिक) येथून अजय वाहने, देवळाली (नाशिक) येथून संतोष चोडके, बार्शी टाकळी (सोलापूर) येथून मोहम्मद जाफर, बाळापूर (अकोला) येथून संजय उमाळे, मुर्तिजापूर येथून तौसर खान, यवतमाळ येथून आनंद गायकवाड, भद्रावती (चंद्रपूर) येथून राखीताई रामटेक, जामखेड–कर्जत येथून अरुण बाबा जाधव, बाळापूर (अकोला) येथून अथरताई, जळगाव जामोद येथून डॉ. मोहम्मद सलीम, संगमनेर (अहिल्यानगर) येथून पुरस्कृत अमजद खान, शेगाव (बुलढाणा) येथून सीमाताई वोवे, जामखेड येथून संगीता भालेराव, अक्कलकोट येथून प्रियांका मडीखांबे, भद्रावती येथून जयश्री दुर्याधन, अकोट (अकोला) येथून इमरान पठाण व लता कांबळे, भद्रावती येथून रंजना गिरडकर व उर्वेलाताई साव, तसेच बार्शी टाकळी येथून साबीर शेख व सय्यद मिर यांचा समावेश आहे.

विशेष म्हणजे चांदूर रेल्वे (अमरावती) येथे प्रियंका निलेश विश्वकर्मा यांनी नगराध्यक्ष म्हणून विजय मिळवला असून, बार्शी टाकळी (सोलापूर) येथे आख्तर खातून यांनी नगराध्यक्ष पदावर बाजी मारली आहे.दरम्यान, "अकोला पॅटर्न" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कामगिरीत वंचित बहुजन आघाडीने अकोला जिल्ह्यात दमदार उपस्थिती नोंदवली आहे. अकोला जिल्ह्यातील नगरपालिकां व नगरपरिषद निवडणुकांत एकूण २६ नगरसेवक निवडून आले आहेत.

बाळापूर नगरपालिकेत १०, बार्शी टाकळी नगरपंचायतीत ४ (यात नगराध्यक्ष पदावर अख्तर खातून विजयी), मुर्तिजापूर नगरपालिकेत ६, तेल्हारा नगरपालिकेत ३, अकोट नगरपालिकेत २, तर हिवरखेड नगरपालिकेत १ नगरसेवक निवडून आला आहे.

या यशामागे पक्षाचे कार्यकर्ते, मतदार आणि नेत्यांचे मोठे योगदान असून, हा विजय बहुजनांच्या स्वाभिमानाचा आणि सामाजिक न्यायाच्या लढ्याचा प्रतीक असल्याची भावना व्यक्त करण्यात येत आहे.वंचित बहुजन आघाडीचा झेंडा अकोल्यात स्वाभिमानाने उंचावला आहे.

## मुदखेड नगर परिषद निवडणूक निकाल जाहीर; भाजपाचा स्पष्ट बहुमतासह सत्ता काबीज

**दैनिक युवक आधार**

**मुदखेड प्रतिनिधी प्रकाश गवारे :** मुदखेड नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीचा निकाल जाहीर झाला असून भारतीय जनता पक्षाने स्पष्ट बहुमत मिळवत नगर परिषदेत सत्ता प्रस्थापित केली आहे. नगराध्यक्षपदी भाजपाच्या सौ. विश्रातीताई माधव कदम यांची निवड झाली आहे.

एकूण २१ जागांच्या नगर परिषदेत भाजपाने १४ नगरसेवक व नगराध्यक्ष पदासह एकूण १५ जागांवर विजय मिळवला आहे. काँग्रेस पक्षाला ४ जागा, तर एमआयएम पक्षाला २ जागा मिळाल्या आहेत.

**प्रभागनिहाय विजयी उमेदवार :**

प्रभाग १ (अ) मोडवान सविता श्रीनिवास (भाजपा),

प्रभाग १ (ब) उपेंद्र लक्ष्मण देवदे (भाजपा),

प्रभाग २ (अ) चौदंते अविनाश नागोराव (काँग्रेस),

प्रभाग २ (ब) पठाण नजीमा खातुन बंदेअली (काँग्रेस),




प्रभाग ३ (अ) पांचाळ प्रेमला गोपीनाथ (भाजपा),

प्रभाग ३ (ब) शेख अब्दुल शेख खदीर (काँग्रेस),

प्रभाग ४ (अ) चौदंते रेखा नितिन (भाजपा),

प्रभाग ४ (ब) चंदे शाम टिकाराम (भाजपा),

प्रभाग ५ (अ) बागवान शमिम सुलताना म. नईत (एमआयएम),

प्रभाग ५ (ब) मोमीन अमीर हमजा अ. हमीद (एमआयएम),

प्रभाग ६ (अ) बल्फेवाड शोमा ओमप्रकाश (भाजपा),

प्रभाग ६ (ब) शेटे सुनील जगन्नाथ (भाजपा),

प्रभाग ७ (अ) बोकेफोड गोदावरी पांडूरंग (काँग्रेस),

प्रभाग ७ (ब) कुरेशी अ. सत्तार सादल्ला (भाजपा),

प्रभाग ८ (अ) चव्हाण रामसिंग भिमराव (भाजपा),

प्रभाग ८ (ब) सोनटक्के निकिता संजय (भाजपा),

प्रभाग ९ (अ) चमकुरे शांताबाई महादू (भाजपा),

प्रभाग ९ (ब) मो. इमरान शेख मैनोद्दीन (भाजपा),

प्रभाग १० (अ) आऊलवार संजय दगडू (भाजपा),

प्रभाग १० (ब) अतिया परविन अ. सलाम (भाजपा).

पक्षनिहाय निकाल :

भाजपा – १४ + नगराध्यक्ष (एकूण १५),

काँग्रेस – ४,

एमआयएम – २.

भाजपाच्या या विजयामुळे शहरात आनंदाचे वातावरण असून, नव्या नगर परिषदेच्या माध्यमातून शहर विकासाला गती मिळेल, अशी अपेक्षा नागरिकांतून व्यक्त होत आहे.

## होमगार्ड वर्धापन दिनानिमित्त श्री भैरवनाथ संस्थानं येथे स्नेहभोजन व सत्कार सोहळा संपन्न

**दैनिक युवक आधार**

**सोयगाव तालुका प्रतिनिधी/ विजय काळे :** शहरातील होमगार्ड वर्धापन दिनानिमित्त प्रसिद्ध श्री भैरवनाथ संस्थान, सोयगाव येथे होमगार्ड बांधवांसाठी दाळ-बट्टीच्या जेवणाचे आयोजन करण्यात आले होते.यासोबतच समाजातील विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित श्री भैरवनाथ संस्थानचे अध्यक्ष दिलीप बिर्ला, नगरसेवक राजेंद्र जावळे,अशोक खेडकर,समाजसेवक संजय शहापूर, शालिक अप्पा (काळे नगर),सुनील गावंडे,मयूर मनगटे,प्रमोद रावणे,भगवान पंडित, संदीप सोमाणी,मच्छिंद्र महाले,




राजु पाटील,विजय जावळे,दत्ता देशाई,प्रल्हाद चौधरी,तसेच पत्रकार विजय पगारे विजय काळे, पूनम परदेशी,ईश्वर इंगळे,दिलीप शिंदे,यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास सर्व स्तरातील नागरिक,मान्यवर,सामाजिक कार्यकर्ते व होमगार्ड बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.उपस्थित मान्यवरांनी होमगार्ड जवानांच्या सेवाभावी कार्याचे कौतुक करत त्यांच्या योगदानाबद्दल गौरवोद्गार काढले.स्नेहपूर्ण व उत्साही वातावरणात हा कार्यक्रम पार पडला.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विशेष परिश्रम तालुका समादेशक अधिकारी कडूबा बावस्कर,लिपिक कृष्णा शेवाळकर,तसेच सोयगाव येथील कर्तव्यदक्ष होमगार्ड जवान गजानन बागुल,समाधान काळे, विजय चौधरी,ज्ञानेश्वर काळे,ऋषी काळे, राज मोहम्मद पिंजारी,गजानन गोतमारे, चंद्रशेखर देशमुख,रमेश चक्की,रवींद्र सरोदे,विशाल घन,किरण सपकाळ, भाग्यवान बनसोडे,विनोद इंगळे,विष्णू गव्हाणे,संतोष परेराव,संतोष घुंगरे,ईश्वर सोनवणे,अरुण वाघ,साहेबराव हटकर,रघु परदेशी,शकील शेख,श्रीराम जोहरे, विजय रावणे,विजय गरुड, यांनी विशेष परिश्रम घेतले

## वार्ड क्रमांक २ अ मध्ये काँग्रेसचा विजय; अविनाश नागोराव चौदंते विजयी

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी/योगेश चौदंते :** नगरपालिका निवडणुकीत वार्ड क्रमांक २ अ मधून काँग्रेस पक्षाचे उमेदवार अविनाश नागोराव चौदंते यांनी घवघवीत यश संपादन केले आहे.

चौदंते यांना एकूण ९८३ मते मिळाली असून त्यांनी आपल्या प्रतिस्पर्ध्यांचा पराभव करत विजय मिळवला आहे.या विजयामुळे वार्ड क्रमांक २ अ मध्ये काँग्रेस पक्षाचे वर्चस्व पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.

निवडणूक निकाल जाहीर होताच काँग्रेस कार्यकर्ते व समर्थकांनी आनंदोत्सव साजरा केला. फटाके फोडून, एकमेकांना शुभेच्छा देत विजयाचा जल्लोष करण्यात आला.

विजयानंतर बोलताना अविनाश नागोराव



चौदंते यांनी मतदारांचे आभार मानले. "वार्डच्या सर्वांगीण विकासासाठी, मूलभूत सुविधा, स्वच्छता, पाणीपुरवठा आणि नागरिकांच्या समस्या प्राधान्याने सोडवण्यासाठी प्रामाणिकपणे काम करेन," असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या विजयामुळे स्थानिक राजकारणात काँग्रेस पक्षाची ताकद वाढल्याचे चित्र दिसून येत आहे.

# दोन वर्षांचा सरकारी हलगर्जीपणा उघड

## ७/१२ दुरुस्तीसाठी शेतकऱ्याची टोकाची लढाई; आत्मदहनाचा थेट इशारा

## वाशिम तालुक्यातील शेतकऱ्यांची महसूलमंत्र्याकडे धाव तहसीलदार, तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांविरोधात गंभीर तक्रार

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे/जिल्हा प्रतिनिधी वाशिम :** महसूल प्रशासनाच्या ढिसाळ कारभारामुळे सामान्य शेतकऱ्याला न्यायासाठी आत्मदहनाचा इशारा द्यावा लागत असेल, तर ही केवळ एका व्यक्तीची व्यथा नसून संपूर्ण यंत्रणेवरचे भयावह आरोपपत्र आहे. वाशिम जिल्ह्यातील मालेगाव तालुक्यातील एरंडा येथील शेतकरी शिवाजी उत्तम सपाटे यांच्या प्रकरणाने महसूल विभागातील बेपर्वाई, वेळकाढूपणा आणि उदासीनतेचा कळस गाठल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे.जमिनीच्या ७/१२ उताऱ्यातील "इतर हिशोब वर्ग–२" मधील स्पष्ट व दस्तऐवजांनी सिद्ध झालेली चूक दुरुस्त करण्यासाठी सपाटे यांनी १५ डिसेंबर २०२३ रोजी तहसील कार्यालयात अर्ज सादर केला. मात्र, "पाच दिवसांनी या"



या एकाच उत्तरावर तब्बल दोन वर्षे नागरिकाला तहसील कार्यालयाच्या पायऱ्या झिजवाव्या लागल्या. या काळात कोणतीही ठोस कार्यवाही न होता, केवळ आश्वासनांवर वेळ ढकलण्यात आली.

**वडिलांचे निधन; तरीही नोंद दुरुस्ती नाही**

या विलंबाच्या काळात सपाटे यांच्या वडिलांचे निधन झाले. त्यानंतर वारस नोंदीसाठी सहा महिने गेले. वारस नोंद झाली, मात्र मूळ प्रश्न असलेली ७/१२ मधील 'इतर हिशोब वर्ग–२' ची चुकीची नोंद आजतागायत कायम ठेवण्यात आली. कायद्यानुसार दुरुस्ती शक्य असतानाही महसूल यंत्रणेने जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचा आरोप शेतकऱ्याने केला आहे.

**कायदेशीर कागदपत्रे असूनही दुर्लक्ष**

संबंधित जमीन ही कुळ कायदा १९५८/५९ अंतर्गत मिळालेली असून,ट्रिब्युनल कोर्टाचा आदेश,

उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांच्या आदेशानुसार केलेला फेरफार,खरेदीखत व परचेस सर्टिफिकेट,

**७/१२, ८-अ, ९/४ आदी सर्व वैध दस्तऐवज**

हे सर्व दुरुस्ती अर्जासोबत जोडलेले असतानाही, एकही अधिकारी निर्णय घेण्यास तयार नसल्याचे चित्र आहे. हा केवळ निष्काळजीपणा नसून, जाणीवपूर्वक सर्व आदेशाचे उल्लंघन करत फाईल दाबून ठेवण्याचा प्रकार असल्याचा आरोप होत आहे.

**अधिकाऱ्यांची भूमिका संशयाच्या भोवऱ्यात**

या प्रकरणात तत्कालीन तहसीलदार निलेश पळसकर, संबंधित ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) व मंडळ अधिकारी यांच्या भूमिकेवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. दोन वर्षांत एकही ठोस आदेश न देणे, फाईल पुढे न सरकवणे आणि नागरिकाला मानसिक छळ सहन करायला लावणे, हे प्रशासकीय निष्काळजीपणाचे नव्हे तर कर्तव्यद्रोहाचे लक्षण असल्याचा आरोप शेतकरी संघटनांकडून होत आहे.

**महसूलमंत्र्यांकडे थेट तक्रार; आत्मदहनाचा इशारा**

न्याय मिळत नसल्याने संतप्त शेतकऱ्याने थेट चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे, वाशिम येथे प्रचारासाठी आले असताना लेखी तक्रार सादर केली.

तक्रारीत दिलेला इशारा अत्यंत गंभीर आहे — "त्वरित न्याय न मिळाल्यास माझ्याकडे व माझ्या कुटुंबाकडे आत्मदहनाशिवाय पर्याय उरणार नाही."

**प्रश्न केवळ एका शेतकऱ्याचा नाही**

७/१२ मधील एका चुकीसाठी एखाद्या शेतकऱ्याला आपले आयुष्य, मानसिक शांतता आणि कुटुंबाचे भविष्य वेठीस धरावे लागत असेल, तर ही लोकशाही व्यवस्थेची शोकांतिका नाही तर काय? महसूल कार्यालयांमध्ये अशी असंख्य प्रकरणे वर्षानुवर्षे प्रलंबित असल्याचीही चर्चा आता उघडपणे सुरू झाली आहे.

**ठोस मागण्या**

भूमी नोंद दुरुस्तीसाठी कालमर्यादा निश्चित करा

प्रलंबित प्रकरणांची विशेष मोहीम राबवून तपासणी करा

दोषी तहसीलदार, तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करा

"इतर हिशोब वर्ग–२" प्रकरणांचा जिल्हानिहाय आढावा घ्या

**न्याय विलंबित म्हणजे न्याय नाकारलेला —**

हे प्रशासनाला आता तरी कळणार आहे का?

की पुन्हा एखादी दुर्दैवी घटना घडल्यानंतरच चौकशी, निलंबन आणि आश्वासनांची औपचारिकता पार पाडली जाणार?

---

## ओतारी समाजाची राजकीय वाटचाल – अभिमानाचा नवे पर्व ; ओतारी पाऊल पडते पुढे समाजघडणीतून सत्ताकेंद्राकडे !

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी ज्योत्सना करवाडे/ विदर्भ प्रमुख :** एरंडोल नगरपरिषद, जि. जळगाव येथील नगरसेवक म्हणून श्री. कृष्णाजी प्रल्हादराव ओतारी यांची झालेली दैदीप्यमान निवड ही केवळ एका व्यक्तीच्या यशाची गोष्ट नसून, ती संपूर्ण ओतारी समाजाच्या सामाजिक जाणिवेची, संघटित ताकदीची आणि दूरदृष्टीपूर्ण वाटचालीची ऐतिहासिक साक्ष आहे. जनतेच्या विश्वासावर, सेवाभावाच्या पायावर आणि निस्वार्थ सामाजिक कार्याच्या भक्कम अधिष्ठानावर उभा राहिलेला हा विजय समाजाच्या स्वाभिमानाला नवी ऊर्जा देणारा आहे

राजकीय क्षेत्र हे सत्तेपुरते मर्यादित नसून ते समाजहित साध्य करण्याचे प्रभावी माध्यम आहे, ही जाणीव ओतारी समाजाने नेहमीच कृतीतून दाखवून दिली आहे. यापूर्वी नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष, उपमहापौर व नगरसेवक अशी विविध जबाबदारीची पदे भूषवून समाजातील कर्तृत्ववान बंधु-भगिनींनी लोकशाहीच्या चौकटीत आदर्श निर्माण केला आहे. त्या गौरवशाली परंपरेचा वारसा पुढे नेत, युवा पिढीतील




समाजशील, कर्तव्यदक्ष व लोकाभिमुख नेतृत्व आज सक्षमपणे पुढे येत आहे, हे अत्यंत समाधानकारक आणि आश्वासक चित्र आहे*.

श्री.कृष्णाजी प्रल्हादराव ओतारी यांचा विजय विशेष अर्थपूर्ण आहे, कारण अपक्ष उमेदवार असूनही त्यांनी मिळवलेला भरघोस जनसमर्थनाचा कौल हा त्यांच्या प्रामाणिक कार्यपद्धतीचा, पारदर्शक सामाजिक सहभागाचा आणि सर्वसामान्यांशी असलेल्या जिव्हाळ्याच्या नात्याचा परिपाक आहे. सत्ता, पक्ष किंवा राजकीय समीकरणांपेक्षा लोकहिताला सर्वोच्च मानणारे नेतृत्व जनतेच्या मनात अढळ स्थान निर्माण करते, याचे हे जिवंत उदाहरण आहे

या विजयामागे ओतारी समाजातील प्रत्येक कुटुंबाचा, प्रत्येक कार्यकर्त्याचा आणि प्रत्येक हितचिंतकाचा विश्वास, परिश्रम व एकजूट दडलेली आहे*. समाजबांधवांनी दाखवलेली ही सामूहिक ताकद भविष्यातील सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक व राजकीय प्रगतीसाठी भक्कम पाया ठरेल, यात शंका नाही. हा विजय नव्या पिढीसाठी प्रेरणास्रोत ठरेल आणि समाजाला विधायक दिशेने पुढे नेणारा दीपस्तंभ ठरेल*.

*नगरसेवक म्हणून श्री. कृष्णाजी प्रल्हादराव ओतारी यांची कारकीर्द लोकाभिमुख, विकासकेंद्रित, पारदर्शक व समाजनिष्ठ राहो, ही सदिच्छा व्यक्त करताना ओतारी समाजाच्या वतीने त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन .

त्यांची पुढील राजकीय वाटचाल अधिक व्यापक, अधिक प्रभावी व अधिक यशस्वी होवो,आणि त्यांच्या माध्यमातून ओतारी समाजाचे नाव सदैव उज्ज्वल राहो, हीच अपेक्षा व हार्दिक शुभेच्छा !!!

---

## वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवारांचा दणदणीत विजय ; नगरपरिषद व नगरपंचायतींमध्ये बहुजन शक्तीचा झेंडा

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी/प्रकाश गवारे :** राज्यातील विविध नगरपरिषद व नगरपंचायत निवडणुकांमध्ये वंचित बहुजन आघाडीने (VBA) उल्लेखनीय कामगिरी करत अनेक ठिकाणी विजय मिळवला आहे. सामाजिक न्याय, बहुजन सशक्तीकरण आणि फुले–शाहू–आंबेडकरी विचारांच्या बळावर लढलेल्या या निवडणुकांमध्ये वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवारांनी मतदारांचा विश्वास संपादन केला आहे. विजयी उमेदवारांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

वंचित बहुजन आघाडीचे खालील उमेदवार विजयी झाले आहेत हीवरखेड (अकोला) येथून सविता सुनील इंगळे, भूम (उस्मानाबाद) येथून रीना शिंदे, कंधार (नांदेड) येथून दिलीप देशमुख, तेल्हारा येथून कांहो पात्रा, भगूर (नाशिक) येथून अजय वाहने, देवळाली (नाशिक) येथून संतोष चोडके, बार्शी टाकळी (सोलापूर) येथून मोहम्मद जाफर, बाळापूर (अकोला) येथून संजय उमाळे, मुर्तिजापूर येथून तौसर खान, यवतमाळ येथून आनंद



गायकवाड, भद्रावती (चंद्रपूर) येथून राखीताई रामटेक, जामखेड–कर्जत येथून अरुण बाबा जाधव, बाळापूर (अकोला) येथून अथरताई, जळगाव जामोद येथून डॉ. मोहम्मद सलीम, संगमनेर (अहिल्यानगर) येथून पुरस्कृत अमजद खान, शेगाव (बुलढाणा) येथून सीमाताई वोवे, जामखेड येथून संगीता भालेराव, अक्कलकोट येथून प्रियांका मडीखांबे, भद्रावती येथून जयश्री दुर्याधन, अकोट (अकोला) येथून इमरान पठाण व लता कांबळे, भद्रावती येथून रंजना गिरडकर व उर्वेलाताई साव, तसेच बार्शी टाकळी येथून साबीर शेख व सय्यद मिर यांचा समावेश आहे.विशेष म्हणजे चांदूर रेल्वे (अमरावती) येथे प्रियंका निलेश विश्वकर्मा यांनी नगराध्यक्ष म्हणून विजय मिळवला असून, बार्शी टाकळी (सोलापूर) येथे आख्तर खातून यांनी नगराध्यक्ष पदावर बाजी मारली आहे.

दरम्यान, "अकोला पॅटर्न" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कामगिरीत वंचित बहुजन आघाडीने अकोला जिल्ह्यात दमदार उपस्थिती नोंदवली आहे. अकोला जिल्ह्यातील नगरपालिकां व नगरपरिषद निवडणुकांत एकूण २६ नगरसेवक निवडून आले आहेत.बाळापूर नगरपालिकेत १०, बार्शी टाकळी नगरपंचायतीत ४ (यात नगराध्यक्ष पदावर अख्तर खातून विजयी), मुर्तिजापूर नगरपालिकेत ६, तेल्हारा नगरपालिकेत ३, अकोट नगरपालिकेत २, तर हिवरखेड नगरपालिकेत १ नगरसेवक निवडून आला आहे.या यशामागे पक्षाचे कार्यकर्ते, मतदार आणि नेत्यांचे मोठे योगदान असून, हा विजय बहुजनांच्या स्वाभिमानाचा आणि सामाजिक न्यायाच्या लढ्याचा प्रतीक असल्याची भावना व्यक्त करण्यात येत आहे.वंचित बहुजन आघाडीचा झेंडा अकोल्यात स्वाभिमानाने उंचावला आहे.

---

## 'गुरुवर्य चं. बा. साखळकर सरांचा जन्मदिन कृतज्ञता दिवस म्हणून उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**

**पाचल (प्रमोद तरळ) :** रत्नागिरी जिल्ह्यातील शैक्षणिक, सामाजिक, राजकीय क्षेत्रातील ज्येष्ठ नामांकित व्यक्तिमत्व गुरुवर्य कै चंद्रकांत बापूजी तथा चं बा साखळकर सर यांचा जन्मदिवस नुकताच १६ डिसेंबर रोजी त्यांची कर्मभूमी पाचल हायस्कूल आणि प्रभादेवी, मुंबई येथेही मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.याप्रसंगी सरांचे विविध क्षेत्रात उच्च पदावर कार्यरत असणारे अनेक माजी विद्यार्थी आवर्जून उपस्थित होते.सरांविषयीच्या आठवणी आपल्या भाषणातून त्यांनी अगदी आत्मियतेने जागवल्या.

पाचल येथील कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ समाजसेवक ओणी येथील वात्सल्य मंदिरचे संस्थापक डॉ महेंद्र मोहन गुजर यांची उपस्थिती लाभली आणि विद्यार्थ्यांना त्यांच्या मार्गदर्शनाचाही लाभ झाला.

मुंबईतील कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून एम् एम् आर् डी ए चे मुख्य अभियंता श्री यतिन साखळकर उपस्थित होते.त्यांनीही आदरणीय सरांच्या आठवणी जागवत आपले मनोगत व्यक्त केले.

आपल्या छोटेखानी पण उत्साहवर्धक भाषणात माजी विद्यार्थी व रेल्वे कामगार संघटनेचे अध्यक्ष संजय जोशी यांनी सरांचे कार्यकर्तृत्व व विद्यार्थ्यांच्या कामगिरीची दिशा



याबाबत अतिशय प्रभावी मार्गदर्शन केले. यावेळी चीफ इंजिनियर यतीन साखळकर, मनोहर नाचणेकर,भाई साखळकर, डॉ उज्वल साखळकर आदी मान्यवर उपस्थित होते सरांना आपल्याकडून अपेक्षित असलेले कार्य, प्रार्थना मंदिर व्हायला हवे या म्हणण्यामागील त्यांची भूमिका याविषयीही प्रतिष्ठानच्या वतीने मार्गदर्शन करण्यात आले.

समाजातील माणूसकी,चांगुलपणा टिकून रहायला हवा.यासाठी मूळात मनामनात कृतज्ञतेची जाणीव जागी रहायला हवी.या कृतज्ञतेतूनच मनात सेवाभावना जागी होते आणि सेवाभावनेने निरपेक्षपणे केलेल्या कामातूनच आपल्या हातून विधायक कामं उभी राहू शकतात. हा 'स्वधर्मविचार' हेच आपल्याही आत्मविकासाचं सूत्र आहे' ...हा गीतेतील विचार शिरोधार्य मानत त्याचा आदर्श सरांनी आपल्या आचरणातून विद्यार्थ्यांसमोर उभा केला. त्यांनी आजीवन त्याग,सेवा आणि प्रेम या त्रिसूत्रीचा अंगिकार केला. या विचारांतूनच असं प्रार्थनामंदिर उभं रहायला हवं..जिथे रोज सामूहिक प्रार्थना केली जाईल..आणि वातारणाचं पावित्र्य राखलं जाईल असं मनोगत त्यांनी दि २९ जानेवारी २०१७ रोजी विद्यार्थ्यांशी साधलेल्या शेवटच्या संवादप्रसंगी मोठ्या तळमळीने व्यक्त केलं होतं,यांच्या मुशीत तयार झालेले किसान व कन्या छात्रालयातील विद्यार्थी विद्यार्थिनी तेव्हापासून नेटाने दरवर्षी दि १६ डिसेंबर या त्यांच्या जन्मदिनी सरांनी दिलेल्या संस्कार आणि विचारांची मोठ्या आदराने उजळण करत त्यांचा जन्मदिन हा कृतज्ञता दिवस म्हणून साजरा करत, सामूहिक प्रार्थनेच्या माध्यमातून त्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा निर्धार उराशी बाळगून मोठ्या नेटाने वाटचाल करत आहेत.

आजवर गेली पाच सहा वर्षे विविध संस्थांना त्यांच्या त्यांच्या गरजेनुसार यथाशक्ती मदत करण्याचा उपक्रमही हे छात्र बंधु भगिनी मोठ्या जोमाने चालवत आहेत.छात्रालयात राहत असतानाच्या काळातील गुरुकुलासारखं आश्रमीय वातावरण ऋषितुल्य गुरुवर्यांच्या प्रेमाची पाखर आणि त्यांची सततची आश्वासक पाठराखण याबाबत मोठ्या आदराने बोलणारे छात्र बंधु भगिनी 'या आपल्या गुरुवर्यांच्या नावे प्रार्थनामंदिर उभं रहावं ' यासाठी खास प्रयत्नशील आहेत.

आपल्या गुरुवर्यांनी आजन्म, अगदी निरपेक्ष भावनेने ज्या ठिकाणी हा सेवायज्ञ अखंडपणे चालवला त्याठिकाणीच त्यांना अपेक्षित असलेलं प्रार्थनामंदिर त्यांच्या नावाने उभं रहावं, अशी या विद्यार्थ्यांची तळमळीची भावना आहे. यासंदर्भातच दि.१६ डिसेंबर रोजी झालेल्या कृतज्ञता दिन सोहळ्यात, त्याकाळी सर राहत असलेल्या ठिकाणी उभ्या राहत असलेल्या इमारतीचे संस्थेने गुरुवर्य चं बा साखळकर प्रार्थना मंदिर असे नामकरण करावे,अशी आग्रहाची मागणी एकमुखाने करण्यात आली. याकामी इमारतीच्या बांधकामासाठी आवश्यक असलेला आर्थिक भार यथाशक्ती उचलण्याचा निर्धारही यावेळी व्यक्त करण्यात आला.

गुरुवर्य चं. बा. साखळकर प्रार्थनामंदिर उभे राहिल्यास ते आदरणीय सरांसारख्या सात्विक,सालस,निगर्वी व्यक्तिमत्वाचे ते खऱ्या अर्थाने यथोचित स्मारक होईल...

अशी भावना सर्वच स्तरांतून व्यक्त होत आहेत

---

## वाशिम : रिसोड नगराध्यक्षपदी भगवानराव क्षिरसागर विराजमान

**दैनिक युवक आधार**

**रिसोड प्रतिनिधी/ रणजितसिंह ठाकुर :** रिसोड नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने नगराध्यक्षपदासह महायुतीने विजय खेचून आणत विरोधकांचा धुव्वा उडवत ऐतिहासिक विजय संपादन केला आहे. नगराध्यक्ष पदाच्या चुरशीच्या लढतीत भाजपचे उमेदवार भगवानराव क्षिरसागर




यांनी महाविकास आघाडीतील उभाटा पक्षाचे पक्षाचे उमेदवार बाळासाहेब उर्फ सुधाकरराव देशमुख यांना 8968तर भाजपचे उमेदवार यांना 9881 मते मिळाली आहे.

913 मतांच्या मोठ्या फरकाने पराभव केला. या विजयाने आळंदी पालिकेवर भाजपचे कमळ फुलले असून, महायुतीने जागा जिंकत भाजपने एकहाती काबीज केली आहे.

अपक्ष उमेदवारांना या निवडणुकीत खाते उघडता आले असून सतिश इरतकर कपबशी या निशानीवर विजय झाले आहे.

---

## खांदा कॉलनीत शिवसेना शाखेचा वर्धापनदिन उत्साहात साजरा

### शिवाजी दांगट यांच्या उमेदवारीने शिवसैनिकांत उत्साह

**दैनिक युवक आधार**

**राजेंद्र कांबळे :** खांदा कॉलनीत शिवसेना उबाठा शाखेचा वर्धापनदिन उत्साहात साजरा झाला या वर्धापनदिनाला खांदा कॉलनीतल शिवसैनिकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती या वर्धापनाचा विषेश उल्लेख म्हणजे शिवसेना उभाटा गटातर्फे शिवाजी दांगट यांची उमेदवारी निश्चित त्यांच्या उमेदवाराला पाठिंबा देण्यासाठी शिवसैनिकांनी मोठी गर्दी केली होती यात महिलांची संख्या मोठ्या प्रमाणात होती यात सत्यनारायण पूजा व महिलान साठी हळदीकुंकू कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते या. कार्यक्रमाला पनवेल परिसरातून विविध शाखा प्रमुखांनी भेट दिली कार्यक्रमाचे आयोजन खांदा कॉलनी शहरं प्रमुख सदानंद शिर्के व त्यांच्या सहकाऱ्यांनी व्यवस्थित रित्या केले होते एकंदरीत खांदा कॉलनीत प्रभाग 15 मधून शिवसेना उबाटा गटा तर्फे महाविकास आघाडी मधून शिवाजी दांगट यांचे नाव निश्चित झाल्यानंतर भाजप त्यांच्या तोडीचा उमेदवार शोधत आहेत यात मराठा मतदारांची संख्या अधिक असल्याने भाजपतर्फे भीमराव पोवार यांचे नाव सर्वाधिक चर्चेत असल्याचे दिसून येत आहे एकंदरीत महादेव वाघमारे व शिवाजी दांगट यांचे नाव महाविकास आघाडी तर्फे निश्चित झाल्यानंतर महायुती कोणताही धोका न पत्करता अनेक सामाजिक संघटनांशी चर्चा करून आपली नावे जाहीर करण्याची शक्यता आहे

# खोपोली भगवामय...कुलदीपक शेंडे यांचा दणदणीत विजय

## नगराध्यक्षपदी 1,118 मतांनी सरशी ; शिंदे गट 14 जागांसह आघाडीवर, राष्ट्रवादीला 7 जागांवर समाधान

■ शरद पवार गटाचे खाते उघडले, अपक्ष राहुल गायकवाड नगरसेवक झाले
■ सुनील पाटील, मसुरकर, पानसरे, सॅम्युअल, रियाज पठाण यांना पराभवाचा झटका

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी खोपोली :** खोपोली नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक 2025 चा निकाल जाहीर होताच शहरात राजकीय चित्र स्पष्ट झाले असून, शिवसेना - भाजप - आरपीआय महायुतीचे उमेदवार कुलदीपक शेंडे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) पुरस्कृत परिवर्तन विकास आघाडीचे उमेदवार, माजी नगराध्यक्ष डॉ. सुनील गोटीराम पाटील यांचा 1,118 मतांनी पराभव करीत नगराध्यक्ष पदावर दणदणीत विजय मिळवला. या विजयामुळे खोपोलीत भगवामय वातावरण निर्माण झाले आहे.



या लढतीत काँग्रेसचे तौफिक करजीकर, आम आदमी पार्टीचे डॉ. रियाज पठाण तसेच पत्रकार किशोर साळुंके यांनी मिळून 1,602 मते घेतली. याशिवाय ऋषिकेश कोंडुसकर (273) आणि पत्रकार अनिल वाघमारे (318) यांनाही लक्षणीय मते मिळाली. या मतविभाजनामुळे मुख्य लढतीतील मतांतील अंतर वाढल्याचे चित्र दिसून आले.

दिग्गजांना पराभवाचा धक्का :- या निवडणुकीत नगराध्यक्षपदाचे उमेदवार डॉ. सुनील पाटील यांच्यासह माजी नगराध्यक्ष दत्तात्रेय मसुरकर, माजी नगरसेवक किशोर पानसरे, जीनी सॅम्युअल आदी दिग्गज नेत्यांना पराभवाचा सामना करावा लागला. शरद पवार गटाचे खाते सुवर्णा मोरे यांच्या विजयामुळे उघडले, तर राहुल गायकवाड हे एकमेव अपक्ष नगरसेवक ठरले.

प्रचारयंत्रणा आणि नेतृत्व :- महायुतीचे उमेदवार कुलदीपक शेंडे यांच्यासाठी आमदार महेंद्र थोरवे यांनी अत्यंत नियोजनबद्ध, शिस्तबद्ध आणि आक्रमक प्रचारयंत्रणा उभी केली. बूथनिहाय व्यूहरचना, मतदारांशी थेट संपर्क आणि संघटनात्मक ताकद यांचा पुरेपूर वापर या विजयामागे निर्णायक ठरला. याउलट, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे आणि जिल्हाध्यक्ष सुधाकर घारे यांची ही प्रतिष्ठेची निवडणूक असतानाही प्रचारातील विस्कळीतपणा व नियोजनाचा अभाव मतदारांच्या नजरेतून सुटला नाही, अशी प्रतिक्रिया शहरात उमटली.

मतदानाचा आढावा :- खोपोली शहरात एकूण 62,074 मतदार नोंदणीकृत होते. त्यापैकी 42,448 मतदारांनी नगराध्यक्षपदासाठी मतदानाचा हक्क बजावला.

विजयी उमेदवार - प्रभागनिहाय (संक्षेप) :-

प्रभाग 1 : मंगेश दळवी (राष्ट्रवादी), श्रुती पालांडे (शिवसेना-शिंदे)

प्रभाग 2 : अमित फाळे, मानसी काळोखे (दोन्ही शिवसेना शिंदे)

प्रभाग 3 : सुवर्णा मोरे (शरद पवार गट), अनिल सानप (शिवसेना शिंदे)

प्रभाग 4 विनायक तेलवणे (राष्ट्रवादी), प्रतिक्षा रेटरेकर (भाजप)

प्रभाग 5 : हर्षदा गायकवाड, समीर मसुरकर (राष्ट्रवादी)

प्रभाग 6 : मयुरी शेलार (शिवसेना शिंदे), राहुल गायकवाड (अपक्ष)

प्रभाग 7 : ऐश्वर्या पाटील, प्रशांत शेंडे (दोन्ही राष्ट्रवादी)

प्रभाग 8 : रुपाली जाधव, रुकसाना जळगावकर (दोन्ही शिवसेना शिंदे)

प्रभाग 9 : गणेश सुतक, तसलीम पाटील (दोन्ही शेकाप)

प्रभाग 10 : अनिता पवार, उज्ज्वला महाडिक, हरीश काळे (शिवसेना शिंदे पॅनल)

प्रभाग 11 : सानिया शेख, विक्रम साबळे (दोन्ही भाजप)

प्रभाग 12 : वनिता कांबळे औटी, निजामुद्दीन जलगावकर (दोन्ही शेकाप)

प्रभाग 13 : अविनाश किर्वे, वंदना सावंत (दोन्ही शिवसेना शिंदे)

प्रभाग 14 : रेश्मा गायकवाड (शिवसेना शिंदे), किशोर पाटील (भाजप)

प्रभाग 15 : स्वेला अहिर (राष्ट्रवादी), संदीप पाटील (शिवसेना-शिंदे)

ही निवडणूक केवळ नगरसेवक किंवा नगराध्यक्ष निवडीपुरती मर्यादित न राहता, आमदार महेंद्र थोरवे यांच्या नेतृत्वाची कसोटी ठरली. अखेरीस, मतदारांनी दिलेल्या कौलातून महायुतीच्या नियोजनबद्ध प्रचाराला मान्यता मिळाल्याचे स्पष्ट झाले. खोपोलीत पुढील पाच वर्षांच्या विकासाची दिशा ठरवणारा हा निकाल मानला जात आहे.

नगराध्यक्षपदाचा निकाल :-
कुलदीपक शेंडे : 20,469 मते
डॉ. सुनील पाटील : 19, 351 मते
मताधिक्य : 1,118

पक्षनिहाय जागा :-
शिवसेना (शिंदे गट) - 14
राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) - 7
भाजप - 4
शेतकरी कामगार पक्ष (शेकाप) - 4
शरद पवार गट - 1
अपक्ष -1

## समीर भैय्या अब्दुल सत्तार यांची सिल्लोडच्या नगराध्यक्षपदी निवड; सोयगावात शिवसेनेकडून जल्लोष

**दैनिक युवक आधार**

**सोयगाव तालुका प्रतिनिधी/विजय काळे** : सिल्लोड, सोयगावचे मा.मंत्री तथा आमदार अब्दुल सत्तार यांचे चिरंजीव समीर भैय्या अब्दुल सत्तार यांची सिल्लोड नगरपालिकेच्या नगराध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल शिवसेनेच्या वतीने सोयगाव शहरात उत्साहात आनंदोत्सव साजरा करण्यात आला.सोयगाव शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक तसेच आमदार अब्दुल सत्तार यांच्या संपर्क कार्यालयाजवळ फटाक्यांची तुफान आतषबाजी करत पेढे वाटून कार्यकर्त्यांनी आनंद



व्यक्त केला.

या वेळी शिवसेना शहरप्रमुख,नगरसेवक संतोष बोडखे,गटनेते अक्षय काळे, नगरसेवक बंटी काळे,रोप कालू,लतीफ शहा,गजानन कुडके,किशोर मापारी,राजू दुतोडे,चेअरमन मोतीराम पंडित,रमेश गंव्हाडे,विक्रम चौधरी,संदीप चौधरी, आमोल मापारी,भगवान वाघ यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी व शहरातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**शिवसेना जिल्हा प्रमुख आबासाहेब काळे यांची प्रतिक्रिया :** "सिल्लोड नगरपालिकेच्या नगराध्यक्षपदी समीर भैय्या अब्दुल सत्तार यांची निवड ही केवळ पदाची नव्हे,तर शिवसेनेच्या विकासाभिमुख राजकारणाची भक्कम मोहर आहे.सिल्लोड सोयगाव मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार व राज्याचे माजी मंत्री अब्दुल सत्तार यांनी आपल्या कर्तृत्वातून तालुका आणि जिल्ह्याच्या विकासाचा ठसा उमटवला असून त्यांच्या नेतृत्वाची छाप आज संपूर्ण मतदारसंघावर आहे.त्याच विकासाची,त्याच लढाऊ शिवसैनिक वृत्तीची आणि जनतेशी थेट नाळ असलेली परंपरा समीर भैय्या पुढे नेत आहेत.विरोधक कितीही अफवा पसरवोत,शिवसेनेची ताकद आणि जनतेचा कौल हा आमच्यासोबत आहे.समीर भैय्या यांच्या नेतृत्वाखाली सिल्लोड शहराचा चेहरामोहरा बदलल्याशिवाय राहणार नाही, हा शब्द आहे."

## ऐतिहासिक मनुस्मृती दहन दिनी आंबेडकरी स्त्री संघटनेतर्फे 'भारतीय स्त्री मुक्ती दिन'चे मुंबईत आयोजन

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / प्रतिनिधी :** २५ डिसेंबर १९२७ रोजी महाड येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेल्या ऐतिहासिक मनुस्मृती दहनाने भारतीय महिलांच्या पारंपरिक गुलामगिरी विरोधातील संघर्षाला नवी दिशा मिळाली. या क्रांतिकारी घटनेच्या स्मरणार्थ आंबेडकरी स्त्री संघटनेतर्फे यंदा मुंबईत 'भारतीय स्त्री मुक्ती दिन' उत्साहात साजरा केला जाणार आहे.

स्त्री स्वातंत्र्य, समता, राज्यघटनात्मक अधिकार तसेच आंबेडकरी विचारधारेतील स्त्री चळवळीच्या ऐतिहासिक योगदानावर या कार्यक्रमात सखोल चर्चा व मार्गदर्शन होणार आहे. हा भव्य कार्यक्रम गुरुवार, २५ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी ४ ते रात्री ८ या वेळेत दादर (पूर्व) येथील मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयातील सुरेंद्र गावस्कर सभागृहात आयोजित करण्यात




आला आहे.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दलित-स्त्रीवादी चळवळीतील बुलंद आवाज, ज्येष्ठ साहित्यिका आणि ख्यातनाम समाजसेविका प्रा. डॉ. विमल थोरात राहणार आहेत. प्रमुख वक्ते म्हणून प्रसिद्ध लेखक, संविधान प्रचारक आणि आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्ते सुरेश सावंत उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत.

आंबेडकरी स्त्री संघटनेच्या संविधान महोत्सव जागृती परिषदेला मिळालेल्या उदंड प्रतिसादानंतर या कार्यक्रमालाही तितकाच उत्स्फूर्त प्रतिसाद मिळेल, असा विश्वास संघटनेच्या संस्थापिका, कार्यकर्त्या, लेखिका, कवयित्री व समीक्षक प्रा. आशालता कांबळे यांनी व्यक्त केला आहे. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी सुकाणू समितीत प्रा. डॉ. प्रज्ञा दया पवार, प्रा. डॉ. श्यामल गरुड, शिरीन लोखंडे, पुष्पा धाकतोडे, नंदा कांबळे, शारदा नवले, छाया खोब्रागडे, छाया कोरेगावकर, प्रा. डॉ. निशा शेंडे, माधुरी शिंदे, सुरेखा पैठणे, वैभवी अडसूळ आणि मयुरा सावी आदी मान्यवर आहेत.

या कार्यक्रमात आंबेडकरी विचारधारेतील स्त्री मुक्तीची भूमिका, संविधानातील समता, स्वातंत्र्य व बंधुता या मूल्यांची सद्यस्थितीतील अंमलबजावणी, महिलांसमोरील समकालीन सामाजिक आव्हाने आणि भविष्यातील दिशा यावर सखोल विचारमंथन केले जाणार आहे.

## देगलूर नगरपालिकेवर राष्ट्रवादीचा झेंडा फडकावला तर भारतीय जनता पार्टीचा सुपडासाफ

**दैनिक युवक आधार**

**तालूका प्रतिनिधी/ महादेव उप्पे देगलूर :** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत सुरुवातीपासूनच देगलूर नगरपालिकेत काँग्रेस विरुद्ध राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातच लढत चालू होती तीच परिस्थिती शेवटपर्यंत कायम राहिली असून निकालाच्या दिवशी शेवटच्या टप्प्यात मात्र राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने बाजी मारत काँग्रेस पक्षाचे उमेदवार श्रीमती मनोरमा मष्णाजी



निलमवार यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार विजयमाला बालाजी टेकाळे यांनी दोनशे पंचेचाळीस मताने पराभव करुन देगलूर नगरपालिकेवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा झेंडा रोवला आहे.या निवडणूकीमध्ये काँग्रेस राष्ट्रवादी काँग्रेस भारतीय जनता पक्ष शिवसेना उबाठा अशा सर्व पक्षाचे उमेदवार रिंगणात होते परंतू देगलूरची जनता मात्र राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे पंधरा व राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या बारा उमेदवारालाच निवडून देत भारतीय जनता पक्षाचा सुपडासाफ करून भारतीय जनता पक्षाचा एकही उमेदवार निवडून आला नाही.

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विचारधारा विभागात आजी-माजी विद्यार्थी मेळावा

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी राहुल मडावी नागपूर :** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज अध्यासनातर्फे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विचारधारा विभागात आजी-माजी विद्यार्थी मेळावा शनिवार दि. २० डिसेंबर २०२५ रोजी विभागातील प्रार्थना सभागृहात करण्यात आला. या मेळाव्यात 'राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या विचारांची गरज' या विषयावरती मुक्त चर्चा करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान माननीय कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर यांनी भूषविले, प्रमुख अतिथी म्हणून कुलसचिव डॉ. राजू हिवसे, मानव विज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी, विज्ञान व तंत्रज्ञान विभाग अधिष्ठाता डॉ. उमेश पलीकुंडवार, मानव विज्ञान विद्या शाखेचे माजी अधिष्ठाता व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विचारधारा विभागाचे माजी विभाग प्रमुख डॉ. दत्तात्रय वाटमोडे, डॉ. गुरुप्रसाद पाखमोडे यांची उपस्थिती होती.राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या साहित्यावर संशोधन व्हावे ही इच्छा यावेळी माननीय कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर यांनी व्यक्त केली. माजी विभाग प्रमुख डॉ. दत्तात्रय वाटमोडे यांनी राष्ट्रसंतांचे साहित्य हे अक्षर वा:डमय असून त्याचा अभ्यास करणे ही काळाची गरज आहे, असे मौलिक विचार व्यक्त केले. डॉ. गुरुप्रसाद वाटमोडे यांनी संत साहित्याचा अभ्यास ही काळाची गरज असून तुकडोजी महाराजांच्या विचारांचा प्रचार प्रसार होण्याच्या दृष्टीने पावले उचलण्याचे आवाहन आजी-माजी विद्यार्थ्यांना केले. वर्तमान स्थितीत समाजातील तरुण भरकटलेला आहे व राष्ट्रसंतांचे विचारच त्यांना योग्य दिशा दर्शवू शकतात असे, मत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विचारधारा विभाग प्रमुख डॉ. विजयालक्ष्मी थोटे यांनी व्यक्त केले.मेळाव्याच्या दुसऱ्या सत्रात आजी-माजी विद्यार्थ्यांना वर्तमान स्थितीत :राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या विचारांची गरज' या विषयावरती मुक्त चर्चा करण्यासाठी आवाहन करण्यात आले होते. त्यानुसार प्रस्तुत कार्यक्रम पार पडला व यावेळी आजी-माजी विद्यार्थ्यांनी आपले विचार प्रभावीपणे



व्यक्त केलेत. कार्यक्रमाचे संचालन प्रा. वर्षा पाटील व आभार डॉ. देवमन कामडी यांनी मानले. यावेळी विभागातील डॉ. जयेंद्र मेश्राम, प्रा. राहुल उईके, प्रा. दिव्या राजुरकर, विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचारी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विभाग प्रमुख, प्राध्यापक वृंद व कल्याणी मेश्राम यांनी परिश्रम घेतले. विभागातील आजी-माजी विद्यार्थी यांचीही यावेळी सहभाग होता.

## उमरी नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक 2025 राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नगर अध्यक्ष 1 तर नगरसेवक 18, काँग्रेस 1, भाजपा 1 स्थानी विजयी

**दैनिक युवक आधार**

**उमरी वार्ताहर /रुपेशकुमार ग.श्रीरामवार** : उमरी नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक 2025 हि अतीतटीची झाली अनेक दिग्जनेते मंडळीची प्रतिष्ठा पणाला लागली होती दिनांक 21/12 /2025 रविवार रोजी सकाळी 10 वाजता हुंतात्मा दत्तात्रय उत्तरवार सभागृह तहसील कार्यालयाच्या पाठीमागे उमरी येथे मतमोजणी 8 टेबलवर 2 राउंड करत निकाल जाहीर करण्यात आला.

उमरी नगरअध्यक्ष पदी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या निवडून आलेल्या उमेदवार सौ.मुदीराज शकुंतला भगवान यांनी 4 हजार 969 मते घेत विजयी झाल्या तर प्रभाग निहाय नगरसेवक पदासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे विजयी उमेदवार प्रभाग क्र.1(अ) झडते सुनंदा शेषराव 443 , प्रभाग क्र.1(ब) चंदनवार संदिप दिलीप 464, प्रभाग क्र.2(अ) कंधारे रतन







बाबुराव 830, प्रभाग क्र.2(ब) खुरेशी सलमा बेगम वसीम 766, प्रभाग क्र.3(अ) खांडरे अनुराधा गजानन 564, प्रभाग क्र.3(ब) जमदाडे साईनाथ हिरामण 616, प्रभाग क्र.4(अ) कटकदवणे अनुसयाबाई विशवनाथ 418, कॉग्रेस चे प्रभाग क्र.4(ब) आडगुडवाड प्रियंका गजानन 411, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रभाग क्र.5(अ) अलसटवार गजानन सुरेश 440 , भाजपा चे प्रभाग क्र.5(ब) कुलकर्णी सायली संजय 397, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रभाग क्र.6(अ) रणनवरे प्रिती विकेंद्र 548, प्रभाग क्र.6(ब) देशमुख कैलास श्रीनवासराव 575, प्रभाग क्र.7(अ) रॅपनवाड सुमनबाई किशनराव 383 , प्रभाग क्र.7(ब)पंडित विष्णुकुमार नंदिकशोर 378, प्रभाग क्र.8(अ) खांडरे रुकमीनबाई शंकर 650, प्रभाग क्र.8(ब) जाधव राजेश शिवराम 624, प्रभाग क्र.9(अ)सिंगनवाड निकीता कबीरराव 408, प्रभाग क्र.9(ब) शिंदे लक्ष्मीबाई विठ्ठल 437,प्रभाग क्र.10(अ) शेळके मिराबाई ईरबा 613, प्रभाग क्र.10(ब) शेख बाबुबेग हुसेनबेग 536 मते घेऊन विजयी झाले असल्याची माहिति निवडणूक निर्णय अधिकारी सौ.मंजुषा भगत, सहायक निवडणूक निर्णय मुख्याधिकारी आशुतोष चिंचाळकर, संजय सोलंनकर यांनी दिली व विजयी उमेदवार यांना विजयी झाल्याचे प्रमाणपत्र देण्यात आले.विजयी उमेदवाराचे उमरी शहरातून भव्य विजयी रॅली काढण्यात आली गोरठेकर बंधूनी आपला गड राखत सर्व जनतेचे आभार मानले.

## सटाणा नगरपरिषदेत बहुमत भाजपला; पण थेट नगराध्यक्ष पद शिवसेना शिंदे गटाला

**दैनिक युवक आधार**

**बागलाण प्रतिनिधी/दीपक गायकवाड :** सटाणा नगरपरिषद सार्वत्रिक पंचवार्षिक निवडणूकीत थेट नगराध्यक्ष पदासाठी तिरंगी लढत झाली यात हर्षदा राहुल पाटील ह्या शिवसेना,शिंदे गटा कडून विजयी झाल्या तर योगिता सुनील मोरे (भाजपा), रूपाली परेश कोठावदे (अपक्ष) यांचा पराभव झाला. मागील नगराध्यक्ष सुनील मोरे(भाजप)यांचा प्रभाग क्रं.५/ब मधून पराभव राहुल(बाबा) सुभाष पाटील(शिंदे शिवसेना गट) हे ५५४ मतांनी विजयी.श्रीमती हर्षदा राहुल पाटील यांनी पहिल्या थेट लोकनियुक्त महिला नगराध्यक्ष बनण्याचा बहुमान मिळवला. या आधी नगरसेवकांमधून पहिल्या महिला नगराध्यक्ष श्रीमती उत्तरा अभिमान सोनवणे या झालेल्या होत्या.सटाणा नगरपरिषदेचे सर्वांगीण प्रगतीसाठी,विकासासाठी,सुख सुविधा देण्यासाठी आम्ही प्रयत्नशील राहणार असल्याचे प्रतिपादन हर्षदा पाटील यांनी केले.

**विजयी उमेदवार व मिळालेली मते प्रभाग अन्वये..**

प्रभाग क्रमांक- १ अ )सीमा पंकज सोनवणे



९४६ (भाजप),१ ब )सुमित विजयराज वाघ ६७७ (भाजप),प्रभाग क्र. २ अ)जयश्री साहेबराव गरुड ९२३(शिवसेना),२ ब)चेतन रौंदळ ७०९ (भाजप),प्रभाग क्र.३ अ) भूषण तानाजी सोनवणे १२१९(शिवसेना) ३ ब) संगीता देवेंद्र सोनवणे (भाजप, बिनविरोध)प्रभाग क्र.४अ)तनुजा किरण नांद्रे १०१७(शिवसेना),४ ब) महेश नानाभाऊ सोनवणे १२७०(भाजप),प्रभाग क्र.५अ)सोनाली दत्तू बैताडे ८८७ (भाजप),५ब)राहुल सुभाष पाटील (शिवसेना)प्रभाग क्र.६अ)अलका लखन बोरसे ६९७ (अपक्ष) ६ब)मंगेश विजय खैरनार १०२१(अपक्ष),प्रभाग क्र.७ अ)प्रतिभा संदीप खैरनार ११२३(भाजप),७ब) चेतन अशोक मोरे १०४७(भाजप),प्रभाग क्र.८ अ)कल्पना दयाराम सोनवणे८५३(अपक्ष),८ब(हर्षवर्धन संजय सोनवणे ११०२(भाजप),प्रभाग क्र.९ अ) विलास भालचंद्र दंडगव्हाळ ६३५(भाजप),९ ब)मनीषा दीपक पाकळे ७४१(भाजप),प्रभाग क्र.१०अ) लताबाई पोपट बच्छाव १२१८(भाजप) १०ब) मुल्ला रउफ खलील शहा ९४६(भाजप),प्रभाग क्र.११अ)नितीन दगाजी सोनवणे (भाजप, बिननविरोध निवड) ११ब)ॲड.हुमेरा यासीन शेख ८२५(राष्ट्रवादी काँग्रेस),प्रभाग क्र. १२ अ) मनीषा जयवंत पवार ११९८(अपक्ष),१२ब)सुनंदा रमेश देवरे ९६०(भाजप)विजयी नगराध्यक्षा व नगसेवक


# विज्ञान व नवोन्मेषातून मानवकल्याणाचा संदेश देणारे डॉ. माशेलकर यांचे कार्य प्रेरणादायी – उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील

## डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या ‘More from Less for More’ पुस्तकाचे मुंबईत प्रकाशन

**दैनिक युवक आधार**
**नागपूर, प्रतिनिधी :**

विज्ञान, शिक्षण आणि नवोन्मेषाच्या माध्यमातून समाजातील विषमता दूर करून मानव कल्याणाचा जागतिक संदेश देणारे पद्मविभूषण डॉ. रघुनाथ अनंत माशेलकर यांचे कार्य तरुण पिढीसाठी अत्यंत प्रेरणादायी असल्याचे प्रतिपादन उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी केले.

आंतरराष्ट्रीय मानवी एकात्मता दिनाचे औचित्य साधून इटरनल कॉर्पोरेट मीडिया प्रा. लि. व Inspiring India यांच्या संयुक्त विद्यमाने ताजमहाल पॅलेस, कुलाबा, मुंबई येथे आयोजित ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर व सुशिल बोर्डे यांच्या “More from Less for More : Innovation’s Holy Grail” या पुस्तकाचे प्रकाशन मंत्री चंद्रकांतदादा पाटील व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.




यावेळी इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी (ICT) चे एमेरिटस प्राध्यापक पद्मविभूषण प्रा. डॉ. एम. एम. शर्मा, रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेडचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मुकेश डी. अंबानी, बजाज ऑटो लिमिटेडचे अध्यक्ष निरज बजाज, गोडरेज इंडस्ट्रीज ग्रुपचे चेअरमन व एम.डी. नादिर गोदरेज, मॅरिको लिमिटेडचे अध्यक्ष हर्ष मरिवाला, काइनेटिक ग्रीन एनर्जी अँड पॉवर सोल्युशन्सच्या संस्थापक व सीईओ सुलज्जा मोटवानी, इटरनल कॉर्पोरेट मीडिया प्रा. लि.चे चेअरमन कृपाशंकर तिवारी तसेच एमडी व सीईओ अलोक तिवारी यांच्यासह उद्योग, शिक्षण व संशोधन क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.




मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी सांगितले की, देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी नवीन शैक्षणिक धोरणाची संकल्पना मांडल्यानंतर ती प्रभावीपणे अंमलात आणण्यासाठी डॉ. माशेलकर यांचे मोलाचे योगदान लाभले आहे. उच्च आणि तंत्रशिक्षण क्षेत्रातील अनेक बदल, नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, आर्टिफिशियल इंटेलिजन्स या क्षेत्रातील राज्याच्या धोरणाबाबतही केलेल्या मार्गदर्शनामुळे नवीन शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीत महाराष्ट्र राज्य आज देशात अग्रस्थानी असल्याचे त्यांनी नमूद केले.

डॉ. माशेलकर यांनी मिळविलेल्या ५४ डॉक्टरेट पदव्या हा देशातील अभूतपूर्व विक्रम असून साध्या पार्श्वभूमीतून जागतिक दर्जाचे वैज्ञानिक नेतृत्व उभे करणारा त्यांचा जीवनप्रवास युवकांसाठी दिशादर्शक असल्याचे श्री. पाटील म्हणाले. जागतिक स्तरावर सर्वोत्कृष्ट वैज्ञानिक म्हणून ओळख असलेल्या डॉ. माशेलकर यांचा हा प्रेरणादायी प्रवास असाच सुरू राहीला, तर भविष्यात त्यांना नोबेल पारितोषिक व भारतरत्न पुरस्काराने सन्मान होईल अशी आशाही त्यांनी व्यक्त केली.

आंतरराष्ट्रीय मानवी एकात्मता दिनाच्या संदर्भात बोलताना मंत्री श्री. पाटील म्हणाले की, राष्ट्रनिर्मितीसाठी एकात्मता, समावेशिता आणि सामूहिक जबाबदारी अत्यंत महत्त्वाची आहे. दारिद्र्य, विषमता आणि सामाजिक आव्हानांवर मात करण्यासाठी विज्ञान, शिक्षण आणि नवोन्मेष प्रभावी ठरतात. “विषमता असूनही समान संधी निर्माण करणे” हा डॉ. माशेलकर यांच्या विचारसरणीचा केंद्रबिंदू असून तो युवक, स्टार्टअप्स, संशोधक आणि धोरणकर्त्यांसाठी प्रेरणादायी ठरेल, असे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी त्यांनी सांगितले की, महाराष्ट्रात लवकरच जिओ विद्यापीठ सुरू होणार असून या माध्यमातून युवकांना जागतिकस्तरावर आपली ओळख निर्माण करता यावी यासाठी नवनवीन आणि आधुनिक अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहेत.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल मंत्री श्री. पाटील यांनी आयोजकांचे अभिनंदन करुन राष्ट्रीय सेवा व एकात्मतेच्या भावनेतून सर्व मान्यवरांनी दिलेल्या योगदानाचे विशेष कौतुक केले. ‘द प्राईड ऑफ इंडिया डॉ. रघुनाथ मालशेकर’ कॉफी टेबल बुक व ‘दिव्य वैज्ञानिक’ या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. तसेच डॉ.रघुनाथ माशेलकर यांनी आपल्या जीवन प्रवास उलगडून सांगितला व त्यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानले.

---

# मुंढवा जमीन घोटाळा प्रकरण : पार्थ पवार यांच्या सहीचे बनावट पत्र व्हायरल; आर्थिक गुन्हे शाखेकडे तक्रार दाखल

**दैनिक युवक आधार**
**पुणे, प्रतिनिधी :**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांच्या नावाचे आणि बनावट सहीचे पत्र समाज माध्यमांवर व्हायरल झाल्याने खळबळ उडाली आहे. या पत्राच्या आधारे मुंढवा येथील जमिनीच्या कथित प्रकरणाशी त्यांचा संबंध असल्याचा खोटा दावा केला जात असून, हा प्रकार पूर्णतः बनावट आणि दिशाभूल करणारा असल्याचे पार्थ पवार यांनी स्पष्ट केले आहे. याबाबत पार्थ पवार यांच्याकडून संबंधित सहीचे खंडन करण्यात आले



असून या प्रकरणाची चौकशीची मागणी करण्यात आली आहे.

येथील व्हायरल होत असलेल्या पत्रात पार्थ पवार यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात मुंढवा जमिनीबाबत अर्ज केल्याचा उल्लेख आहे. मात्र, या पत्राशी आपला कोणताही संबंध नसून आपण असे कोणतेही पत्र लिहिलेले नाही किंवा त्यावर सही केलेली नाही, असे त्यांनी स्पष्ट केले आहे. या पत्रावर संबंधित शासकीय कार्यालयाची कोणतीही पोहोच पावती नसल्याने ते बनावट असल्याचे प्राथमिकदृष्ट्या स्पष्ट होत आहे.

या प्रकरणी पार्थ पवार यांनी पुणे शहरातील आर्थिक गुन्हे शाखा आणि सायबर गुन्हे विभागाकडे अज्ञात व्यक्तीविरोधात फौजदारी तक्रार दाखल केली आहे. समाजमाध्यमांवर खोटी कागदपत्रे प्रसारित करून बदनामी करण्याचा आणि खोट्या प्रकरणात गोवण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप त्यांनी तक्रारीत केला आहे.

दरम्यान, यापूर्वी २०२१ साली महसूल विभागाकडे सादर करण्यात आलेल्या एका अर्जाचा गैरवापर करून सध्याच्या बनावट पत्रांशी त्याची सांगड घालण्यात येत असल्याचेही तक्रारीत नमूद आहे. मात्र तो अर्ज वेगळ्या स्वरूपाचा असून सध्या व्हायरल होत असलेल्या पत्रांशी त्याचा कोणताही संबंध नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

या प्रकारामागे कोण आहे, बनावट सही कोणी केली आणि समाजमाध्यमांवर हा खोटा प्रचार कोणी पसरवला, याची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी पार्थ पवार यांनी

---

# पश्चिम रेल्वे मार्गावर नाताळपर्यंत प्रवाशांना मनस्ताप, ब्लॉकमुळे दररोज सुमारे १०० लोकल रद्द

**दैनिक युवक आधार**
**मुंबई, प्रतिनिधी :**

पश्चिम रेल्वेवरील कांदिवली ते बोरिवली दरम्यान सहाव्या मार्गाच्या कामासाठी शनिवारपासून ब्लॉक घेण्यात आला असून हा ब्लॉक पुढील ३० दिवसांचा म्हणजे १८ जानेवारी २०२६ पर्यंत असेल. या ब्लॉकमुळे शेकडो लोकल फेऱ्या रद्द होतील. इतर लोकल फेऱ्यांच्या वेळापत्रकावर परिणाम होईल. नाताळपर्यंत दररोज सुमारे १०० लोकल रद्द होतील. दरम्यान, शुक्रवारी ८७ लोकल फेऱ्या रद्द केल्या जातील. त्यामुळे पश्चिम रेल्वेवरील प्रवाशांना विस्कळीत झालेल्या वेळापत्रकाला सामोरे जावे लागेल.पश्चिम रेल्वेवरील बोरिवलीपर्यंतचे सहाव्या मार्गिकेचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. कांदिवली ते बोरिवली दरम्यान रूळ बदलणे, नवीन रूळ जोडणे, अनेक क्रॉसओव्हर बसवणे व काढणे ही कामे केली जातील. तसेच अभियांत्रिकी, सिग्नलिंग आणि ओव्हरहेड उपकरणांची मोठी कामे करण्यात येतील. हे काम जानेवारी २०२६ पर्यंत पूर्ण करून मेल-एक्स्प्रेससाठी नवीन मार्गिका उपलब्ध करून देण्यात येतील. ज्यामुळे लोकल फेऱ्यांची संख्या वाढण्यास मदत होईल.वांद्रे ते बोरिवली सहावा मार्ग एक्स्प्रेससाठी स्वतंत्रपणे सुरू करण्याचे पश्चिम रेल्वेचे उद्दीष्टे आहे. सध्या वांद्रे टर्मिनस ते कांदिवलीपर्यंत सहाव्या मार्गिकेचे काम पूर्ण झाले. या मार्गावरून एक्स्प्रेस धावतात. तर, आता शेवटचा आणि महत्त्वाचा कांदिवली ते बोरिवलीचा टप्पा बांधकामधील आहे. हे काम सध्या घेतलेल्या ३० दिवसांच्या ब्लॉकमध्ये करण्याचे लक्ष्य पश्चिम रेल्वेने ठेवले आहे. या ब्लॉकमुळे दररोज लोकल सेवा रद्द होतील. काही लोकल सेवा अंशत: रद्द केल्या जातील. तसेच लांब पल्ल्याच्या रेल्वेगाड्यांच्या वेळापत्रकात काहीसा बदल होईल.


सोमवारपासून ते शुक्रवारपर्यंत दररात्री ११ ते पहाटे ४.३० वाजेपर्यंत ब्लॉक असेल. सोमवार ते गुरुवारपर्यंत दररोज अप ४७ आणि डाऊन ४७ अशा एकूण ९४ लोकल फेऱ्या रद्द केल्या जातील.

---

# येरवडा कारागृहात कैद्यांच्या हल्ल्यात एकाचा मृत्यू

**दैनिक युवक आधार**
**पुणे, प्रतिनिधी :**

येरवडा कारागृहात दोन सराईत गुन्हेगारांनी केलेल्या हल्ल्यात जखमी झालेला एक कैदी शुक्रवारी (दि.१९) ससून रुग्णालयात मरण पावला. यासंदर्भात येरवडा पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विशाल नागनाथ कांबळे हे हल्ल्यात मरण पावलेल्या कैद्याचे नाव आहे. आकाश सतीश चंडालिया व दीपक संजय रेड्डी यांच्याविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कांबळे तसेच आरोपी चंडालिया व रेड्डी गुन्हेगार आहेत. कांबळे एका



खुनाच्या गुन्ह्यात २०१९ पासून येरवडा कारागृहात होता. तसेच, एका खुनाच्या गुन्ह्यात चंडालिया व खुनी हल्ल्याच्या गुन्ह्यात रेड्डीही तुरुंगात आहेत. स्थानिक वर्चस्वाच्या वादातून चंडालिया व कांबळे यांच्यात वैमनस्य होते. कारागृहातही त्यांची अनेकदा भांडणे झाली होती. त्यामुळे, कांबळे याचा काटा काढण्याचा कट चंडालिया याने रचला होता. त्यासाठी तो संधीची वाट पाहत होता.येरवडा कारागृहात सकाळी बरॅक उघडल्यानंतर कैदी बाहेर आले. मात्र, कांबळे पुन्हा आत जाऊन झोपला. असलेल्या चंडालिया आणि रेड्डी यांनी तो झोपेतच असताना हल्ला चढवला. त्यांनी त्याच्या डोक्यात व कमरेवर अणकुचीदार फरशीच्या तुकड्याने वार केले. या प्रकारामुळे अन्य कैदी घाबरून पळाले. या प्रकाराची माहिती मिळाल्यावर कारागृह रक्षकांनी तेथे धाव घेतली. कांबळे अतिशय गंभीर जखमी झाला होता. त्याला तातडीने ससून रुग्णालयात हलवण्यात आले. तेथे उपचार सुरु असताना कांबळे मरण पावला. याप्रकरणी दोन्ही आरोपीना कारागृहातून अटक करण्यात आली आहे.

---

# सिल्लोडवर 'सत्तार' पर्व कायम; भाजपचा सुफडा साफ! नगराध्यक्षपदी अब्दुल समीर यांचा ऐतिहासिक विजय; २८ पैकी २५ जागांवर शिवसेनेचा भगवा

**दैनिक युवक आधार**
**योगेश पालोदकर/सिल्लोड :**

राजकीयदृष्ट्या अत्यंत संवेदनशील आणि प्रतिष्ठेच्या ठरलेल्या सिल्लोड नगर परिषद निवडणुकीत राज्याचे अल्पसंख्याक विकास मंत्री आ. अब्दुल सत्तार यांनी आपला बालेकिल्ला पुन्हा एकदा अभेद्य राखला आहे. 'विकासकामांचा झंझावात' आणि 'नियोजनाची ताकद' यांच्या जोरावर सत्तार यांच्या नेतृत्वाखालील पॅनेलने भाजपचा दारुण पराभव करत नगर परिषदेवर एकहाती वर्चस्व मिळवले आहे. नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीत अब्दुल समीर यांनी तब्बल २३ हजारांहून अधिक मताधिक्य घेत विरोधकांना चारी मुंड्या चित केले.भाजपचा दारुण पराभव; ८ हजारांचा टप्पाही ओलांडता आला नाही या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाला मोठ्या पराभवाचा धक्का बसला आहे. आ.



सत्तार यांच्या झंझावातासमोर भाजपचा तंबू पूर्णपणे उखडला गेला. नगराध्यक्ष पदाच्या उमेदवाराला साधी ८ हजार मतांची वैयक्तिक खेपही गाठता आली नाही. २८ जागांपैकी भाजपला केवळ ३ जागांवर समाधान मानावे लागले, तर शिवसेनेने २५ जागा जिंकून निर्विवाद बहुमताचा झेंडा फडकवला.

**अब्दुल समीर यांचा 'विक्रमी' विजय**

नगराध्यक्ष पदासाठी झालेल्या चुरशीच्या लढतीत शिवसेनेचे उमेदवार अब्दुल समीर अ. सत्तार यांनी ३१ हजार ४३८ मते मिळवून आपला विजय निश्चित केला. त्यांनी भाजप उमेदवाराचा २३ हजार ६२६ मतांनी पराभव केला. मतमोजणीच्या पहिल्या फेरीपासूनच समीर यांनी घेतलेली आघाडी शेवटपर्यंत कायम राहिली. त्यांच्या या विजयाने सिल्लोडच्या राजकारणात एक नवा 'युवा अध्याय' सुरू झाला आहे.

"हा विजय सिल्लोडच्या जनतेचा आणि विकासाचा आहे. आ. अब्दुल सत्तार साहेबांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही शहराचा चेहरामोहरा बदलण्यासाठी कटिबद्ध आहोत. रस्ते, पाणी, स्वच्छता आणि युवकांचे प्रश्न सोडवण्याला माझे पहिले प्राधान्य असेल."

— अब्दुल समीर, नवनियुक्त नगराध्यक्ष, सिल्लोड.

**शहरात गुलालाची उधळण आणि जल्लोष**

निकाल जाहीर होताच संपूर्ण सिल्लोड शहरात शिवसैनिकांनी एकच जल्लोष केला . "कोण आला रे कोण आला, सत्तारांचा वाघ आला", "अब्दुल समीर आगे बढो" अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला होता. फटाक्यांची आतिषबाजी आणि ढोल-ताशांच्या गजरात काढण्यात आलेल्या विजयी मिरवणुकीने शहराचे वातावरण 'शिवमय' झाले होते. कार्यकर्त्यांनी एकमेकांना गुलाल लावून आणि पेढे वाटून आनंद साजरा केला.

**विकासाच्या अजेंड्याला मतदारांची साथ**

निवडणूक प्रचारात आ. सत्तार यांनी मांडलेले विकासाचे व्हिजन, शहरातील पाणीपुरवठा योजना, रस्ते आणि मूलभूत सुविधांच्या कामावर मतदारांनी विश्वास दर्शवल्याचे या निकालावरून स्पष्ट होत आहे. या विजयामुळे जिल्ह्याच्या राजकारणात आ. अब्दुल सत्तार यांचे वजन पुन्हा एकदा वाढले असून, विरोधकांसाठी हा निकाल मोठा धडा मानला जात आहे.

---

# राज्य सरकारकडे मुंबई महापालिकेची थकबाकी १०,९०० कोटींवर


**थकबाकी मिळवण्यासाठी पालिका प्रशासनाचे राज्य सरकारला पत्र**

**दैनिक युवक आधार**
**मुंबई, प्रतिनिधी :**

निवडणुकीच्या तोंडावर राज्य सरकारने विविध महापालिकांना मूलभूत सुविधांसाठी निधी देण्याची घोषणा केली असली तरी मुंबई महापालिकेचे तब्बल १० हजीर ९०० कोटी रुपये राज्य सरकारकडे थकीत आहेत. शिक्षण विभागासह विविध विभागांची थकबाकी वर्षानुवर्षे वाढत असून डिसेंबर २०२५ अखेरीस ही थकबाकी १० हजार कोटींच्या पुढे गेली आहे. ही थकबाकी मिळावी अशी विनंती करणारे पत्र पालिका प्रशासनाने राज्य सराकरला पाठवले आहे.

मुंबई महापालिकेने गेल्या दोन – तीन वर्षांत मोठ्या खर्चाचे अनेक प्रकल्प हाती घेतले असून पालिकेची विविध मोठमोठ्या प्रकल्पांची व विविध विकासकामांची देणी तब्बल २ लाख ३२ हजार कोटींच्या पुढे गेली आहे. पालिकेच्या उत्पन्नाचे स्रोतही ‘जैसे थे’ आहेत. मुंबई महापालिकेने उत्पन्न वाढवण्यासाठी आपल्या मालकीचे भूखंडही लिलावाने देण्याची तयारी सुरू केली आहे.

उत्पन्न वाढवण्यासाठी मुंबई महापालिकेची धडपड सुरू असताना राज्य सरकारकडे



असलेली वर्षानुवर्षांची थकबाकीही मिळालेली नाही. त्यात अजूनच भर पडत आहे. गेल्या आर्थिक वर्षात ९७०० कोटींवर असेली थकबाकी डिसेंबर २०२५ पर्यंत १० हजार ९०० कोटींवर गेल्याची माहिती पालिकेतील सूत्रांनी दिली.

**या विभागांची रक्कम थकीत**

राज्य सरकारच्या विविध खात्यांकडून सहाय्यक अनुदान, मालमत्ता कर, पाणीपट्टी इत्यादीची थकबाकी आहे. त्यात शिक्षण विभागाकडून येणाऱ्या अनुदानाची रक्कम सगळ्यात मोठी असून सात हजार कोटींची रक्कम थकीत आहे.

गृहनिर्माण विभागाचीही ७०० कोटी रुपये असलेली थकबाकी आता ९०० कोटी रुपयांपर्यंत पोहोचली आहे. नगर विकास विभागाकडूनही दीड हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक थकबाकी येणे आहे. गृह विभागाकडूनही येणाऱ्या थकबाकीत मोठी वाढ आहे. एकूण थकबाकी असलेल्या राज्य सरकारच्या विभागांमध्ये सार्वजनिक आरोग्य विभाग, पाटबंधारे विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग आदींचा समावेश आहे.

राज्य सरकारच्या विविध खात्यांच्या वसुलीबाबत व समायोजनाबाबत मुंबई महापालिका दरवर्षी पत्रव्यवहार करीत असते.

मात्र दरवर्षी थकबाकी मिळत नाहीच, पण थकीत रक्कम मात्र वाढत जाते. यंदाही मुंबई महापालिकेने राज्य सरकारला पत्र पाठवून थकबाकीची मागणी केली असून राज्य सरकारच्या २० विविध खात्यांनाही यंदा पत्र पाठवून थकबाकीची मागणी पालिका प्रशासनाने केली आहे.